म. ग्र. सं. वाच
विषय का० वा०
दा. क्र. १२२८७

१२२८७

IRBK-011228
IRBK-011228

13 MAY 1976
16 APR 1975
७६५९३ / ३०।३।०७
३६५०

# हॅन्स् अँडरसनच्या परीकथा

१२२८६
26 JUN 1975

■ भाग पाचवा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रमांक ७६५९३ वि. बा.वा.
क्रमांक ३६५० नोंद दि. ३०।३।०७

■ सौ. सुमति पायगांवकर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा,
क्र. ९२२८६ नों दि ..........
वि. बा.वा. क्र. ..........

IRBK-0112287

व्हीनस प्रकाशन : पुणे

आवृत्ति पहिली : ऑगस्ट १९६८

किंमत रु. दोन फक्त

चित्रकार :
**वसंत सरवटे**

प्रकाशक :
**स. कृ. पाध्ये**
व्हीनस प्रकाशन
तपश्चर्या, ३८१ क शनिवार पेठ : पुणे २

मुद्रक :
**वि. पु. भागवत**
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, : मुंबई ४

१७८ ए, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४
आषाढी एकादशी ६·७·१९६८

माझ्या छोट्या दोस्तांनो,

चौथ्या भागानंतर बरोबर चार वर्षांनी हा पाचवा भाग तुमच्या हाती येत आहे. या चार वर्षांत मी जेव्हा जेव्हा शाळांच्या तपासणीला जाई तेव्हा तेव्हा तुम्ही मला हटकून विचारत होता, "बाई, अँडरसनचा पाचवा भाग केव्हा निघणार? अजून का नाही छापला"?... या तुमच्या प्रश्नांनी मला फार वाईट वाटे. तो भाग तावडतोब तुमच्या हाती देणे शक्य नाही या कल्पनेने मन बेचैन होई. वास्तविक पुढचे सगळे भाग तुमच्यासाठी मी केव्हाच लिहून तयार ठेवलेले होते. केवळ चित्रकाराकडून उपस्थित झालेल्या अडचणींमुळे इतकी वर्षें माझी विनाकारण अडवणूक झाली.

तुम्ही अतिशय उत्सुक असूनही पुढले भाग तुम्हाला वेळेवर मिळू शकले नाहीत याबद्दल दिलगीर आहे. या पाचव्या भागातल्या पाच गोष्टींत तीन गमतीदार आहेत. 'जादूचे जोडे' ही गोष्ट जुन्या काळातल्या युरोपीय देशांची पुष्कळशी कल्पना देते. 'डबक्यातला एकच थेंब' ही गोष्ट तऱ्हेतऱ्हेच्या लोकांच्या वागणुकीचे एक चित्र दाखविते. हे चित्र आपल्या मनाला फार पटते आणि वाटते, "खरंच, अशी माणसं रोज कितीतरी पाहातो आपण!"

अँडरसनच्या परीकथांचा सहावा भागही या मागोमागच येत आहे. त्यातली 'हिमराणी'-ची गोष्ट तर अतिशय आवडेल तुम्हांला.


तुमची

सौ. सुमति पायगांवकर

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| बाबांचं करणं बाई, नेहमीच बरोबर | १ |
| डबक्यातला एकच थेंब | ९ |
| अगदी अगदी खरं | १४ |
| जादूचे जोडे | १९ |
| उडती पेटी | ४८ |



# "बाबांचं करणं बाई, नेहमीच बरोबर..."

दूर एका खेड्यात एक जुना शेतमळा होता. मळ्यातल्या घराला गवतीच छप्पर होते. छपरावर गवत उगवले होते—शेवाळ उगवले होते. गवताच्या आधाराने एका करकोच्याने आपले घरटेही बांधले होते. घराच्या भिंती उतरत्या होत्या आणि खिडक्या खूप खाली होत्या. त्या खिडक्यांतली एकच अवघी नेहमी उघडलेली असे. स्वैपाकाच्या ओट्याच्या ठिकाणी, भिंतीला बाहेरच्या अंगाला टेंगूळ आल्यासारखे दिसत होते. कुंपणाच्या भोवती एल्डरवृक्ष वाकले होते. फाटकापाशी एक छोटेसे तळे होते आणि त्यात दोन तीन बदके डुंबताना दिसत. घराच्या दारालगत कुत्र्याचे टपरे देखील होते. त्यात एक चांगल्यापैकी राखणदार कुत्रा राहायचा आणि प्रत्येक येणाऱ्या-जाणाऱ्याच्या अंगावर जोरजोरात भुंकायचा.


या शेतमळ्यातल्या घरात एक म्हातारा शेतकरी आणि त्याची बायको राहायचे. त्यांच्या-


जवळ स्वतःच्या मालकीच्या, मोठ्या अभिमानाने दाखवता येण्याजोग्या वस्तू फारच थोड्या होत्या. आणि एक होती ती नसती तरी निभले असते. ही वस्तू म्हणजे त्यांचा घोडा. रस्त्याच्या कडेकडेने वाढलेल्या गवतावरच त्याची गुजराण चाले. तो म्हातारा शेतकरी या घोड्यावर बसूनच शेजारच्या गावी बाजाराला जाई. म्हातारा आपल्या शेजाऱ्या-पाजाऱ्यांना तो घोडा उसनाही देई आणि त्याच्या बदल्यात ते लोकही मग या म्हाताऱ्या जोड-प्याला कित्येकदा काहीबाही मदत करीत.

त्या शेतकऱ्याला सगळे **बाबा** म्हणत. बाबांना नि त्या शेतकरणीला अनेकदा वाटे की, घोडा विकून त्या पैशांत घरात लागणारी जास्त जरुरीची वस्तू घ्यावी. पण प्रश्न असा पडे की काय घ्यावे.

शेतकरीण एकदा म्हणाली, "बाबा, तुम्हांला कसं अगदी बरोबर कळतं. आजच तर आहे बाजाराचा दिवस. आज जर घोड्यावरूनच बाजाराला गेलात नि बदल्यात दुसर काही आणलंत तर? तुम्ही कसं अगदी बरोबर कराल बाई सगळं. जा बरं जरा बाजाराला."

तिने त्याच्या गळ्याभोवती गळपट्टा गुंडाळून दिला. असा झक्क बांधला दोन्ही टोके बाहेर काढून! इतकी छान दिसत होता तो. नंतर आपल्या हाताच्या तळव्याने तिने त्याची





टोपी ठाकठीक केली. मग मोठ्या प्रेमाने त्याची पाठ थोपटून, तो घोड्यावर बसता बसता त्याला निरोप दिला. याच घोड्याच्या बदलीत आज दुसरे काहीतरी आणायचे होते.

निरभ्र आकाशात सूर्य बराच वर आला होता. लोकांचे थवे, काही घोड्यांवरून, काही गाडीतून, काही पायीच असे धूळभरल्या रस्त्यावरून बाजाराकडे चालले होते. रस्त्यावर कुठेही सावली नव्हती.

त्या घोळक्यांतला एकजण आपली गाय बाजाराला घेऊन चालला होता. पाहाणाऱ्याच्या एकदम मनात भरेल अशी गाय होती ती. आपला म्हातारा शेतकरी म्हणाला, "केवढं कमालीचं दूध देईल ही! माझा घोडा देऊन बदलीत ही गायच घेतलेली बरी."

"अहो गायवाले, अहो ऐकलं का" शेतकरी म्हणाला, "मी काय म्हणतो समजलं? गाईपेक्षां घोड्याची किंमत पुष्कळ असते हं ठाऊक आहे मला. पण मला त्याचं काही विशेष वाटत नाही. कारण ही गाय मला जास्त उपयोगी पडेल. तुमची इच्छा असेल तर हा घोडा घेऊन गाय देऊन टाका."

गायवाला म्हणाला, "ठीक आहे. जरूर घ्या गाय." आणि सौदा पटला.

तो म्हातारा शेतकरी आता घराकडे माघारा वळायला हवा होता. कारण त्याचे काम उरकले होते. पण एवीतेवी बाजाराला निघाला होता तो. तेव्हा त्याला वाटले बाजारात

काहीही नव्या गोष्टी न पाहाताच का परत जायचे ? म्हणून तो आपली गाय हाकीत पुढे निघाला.

थोड्याच वेळात त्याला एक माणूस आपला मेंढा घेऊन जाताना भेटला. फार छान मेंढा होता तो. गुबगुबीत आणि खूप लोकर असलेला !

शेतकरी मनात म्हणाला, "मला भारी आवडला आहे तो मेंढा. रस्त्याच्या कडेच्या गवतावर व्यवस्थित पोसला जाईल तो आणि हिवाळ्यात घरात उपयोगी पडेल. गायीपेक्षा बऱ्याच बाबतीत मेंढा जास्त सोयीचा."

त्याने त्या मेंढेवाल्याला विचारले, "आपण करू या का अदलाबदली ?"

"अगदी खुशीनं !" मेंढेवाला म्हणाला. लगेच अदलाबदली झाली नि आमचा शेतकरी आता आपला मेंढा घेऊन बाजाराकडे निघाला.

जरा वेळ झाला नाही तोच आपले छानसे बदक हातात धरून बाजूच्या शेतातून एक माणूस बाहेर रस्त्यावर आला.

म्हातारा शेतकरी म्हणाला, "किती सुरेख बदक आहे हे तुझं. गुटगुटीत, लठ्ठगुठ्ठ आणि सारी पिसं फुटलेलं. आमच्या तळ्याच्या बाजूला, कठड्याला एखाद्या दोरीनं बांधून ठेवलं तर किती गोड दिसेल तिथं ! माझ्या म्हातारीला भारी आवडेल ते. काहीही खरकटं मरकटं खाऊ घालू शकेल ती त्याला. कितीदा तरी ती असल्या बदकाबद्दल म्हणाली होती. आता बरोबर संधि आली आहे. तिला दिलंच पाहिजे घेऊन." मग तो त्या बदकवाल्यालाहे म्हणाला, "हा मेंढा घेऊन जर तुम्ही मला ते बदक दिलंत तर फार उपकार होतील पहा...."

त्या माणसाने लगेच ते बदक देऊन मेंढा घेतला.

हा वेळपर्यंत जवळजवळ ते बाजारापाशीच आलेले होते.

रस्त्यावर गर्दी तर इतकी वाढली की माणसे, जनावरे एकमेकांशी घुसमटत जात होती. आजू-



बाजूच्या बटाट्याच्या शेतातूनही चालत होते काहीजण. एका शेतात, एका खुंटाला, पायात दोरी अडकवून एक कोंबडी बांधलेली होती. लोकांना पाहून घाबरून ती इकडे तिकडे जाऊ नये म्हणून ती व्यवस्था केली होती. कोंबडीला छोट्या छोट्या पिसांची शेपटीही आली होती. तिने आपल्या शेतकऱ्याकडे पाहून आपले गोल गोल डोळे मिचकावले आणि 'क्लक क्लक' असा आवाज केला. तिला काय म्हणायचे होते ते सांगणे कठीण आहे. पण आपल्या शेतकऱ्याची तिच्याकडे नजर जाताच तो ओरडला, "माझ्या जन्मात इतकी सुंदर कोंबडी मी कधी पाहिली नव्हती. प्रार्थना मंदिरातल्या पुजाऱ्याची ती कोंबडी काहीच नाही हिच्यापुढे. आणि कोंबडी स्वतःच आपलं पोट भरते म्हणे. इकडे एक दाणा टिपला, तिकडे एक टिपला की भरलं पोट! शपथ, ही कोंबडी मला हवी आहे. तिथल्या बटाट्याच्या मळेवाल्याला तो म्हणाला, "अहो, अदलाबदल करू या का या बदकाची नि त्या कोंबडीची?" आणि अदला-बदल झाली देखील! मळेवाल्याला बदक मिळाले आणि आपल्या म्हाताऱ्या शेतकऱ्याला कोंबडी!

रस्ताभर, हा वेळपर्यंत, बऱ्याच तऱ्हांचा व्यवहार केल्याने तो म्हातारा शेतकरी आता जरा दमला होता. एखादी पावाची काप, जरासे चीज नि बीर मद्याच्या एका पेल्याने नक्कीच तरतरी येईल असे वाटले त्याला. तो एका विश्रांतिगृहाकडे वळला. तो आत शिरत असतां तिथला नोकरही त्याच्या बाजूने आत जाऊ लागला. त्याच्या हातात एक खूप जड पोते होते. "त्या पोत्यात काय आहेरे तुझ्या?" आपल्या शेतकऱ्याने त्याला सहज विचारले.

"सफरचंद" तो म्हणाला, "अहो आमच्या डुकरांना मेजवानी आहे आज या सबंध पोतं-भर सफरचंदांची!"

"काय? डुकरांना सफरचंद? केवढी उधळपट्टी ही? माझ्या बायकोनं विचारीनं ही पाहिली असती तर केवढी खूप झाली असती ती. आमच्या झाडाला गतवर्षी अवघं एक सफर-चंद आलं होतं. आम्ही ते दर दिवशी पाहाता यावं म्हणून कपाटावर तसंच ठेवून दिलं होतं. शेवटी तिथंच नासलं ते. आमचं जणू वैभवच ते—माझी बायको म्हणायची. ही पोतंभर सफरचंदं पाहून ती काय म्हणेल? खरंच बिचारीनं पाहायलाच हवी होती."


तो माणूस म्हणाला, "पोतं आणि त्यांतली सफरचंदं यांचं काय देशील तू?--" म्हातारा शेतकरी म्हणाला, "त्यांच्याबदली माझी ही कोंबडीच देईन बघ."

त्याने कोंबडी देऊन सफरचंदे घेतली. त्याने ते पोते त्या विश्रांतीगृहाच्या पिछाडीला स्वयंपाकघरांत नेऊन काळजीपूर्वक ठेवले. स्वैपाकाच्या भट्टीला लागून ठेवले गेले ते. मग तो पुन्हा आपल्या जागी गेला. तो दिवाणखाना विविध पाहुण्यांनी भरला होता. घोडेवाले, गाईवाले, शेतकरी वगैरे सगळे होते तिथे. त्यांच्यात दोन नवीन माणसे येऊन मिसळली. ती इतकी श्रीमंत होती की

सोन्याच्या मोहोरा मावतही नव्हत्या त्यांच्या खिशात! जोरात एकसारख्या पैजा मारत होते ते!

"स्सऽऽऽ स्सऽऽ" असा कसला आवाज त्या भट्टीजवळ येतोय? ती सफरचंदे भाजली जात होती! सगळे म्हणाले, "कसला तो आवाज?"

म्हातारा शेतकरी म्हणाला, "मी सांगतो." आणि त्याने अथपासून इतिपर्यंत आपली सगळी गोष्ट, सगळ्या अदलाबदल्या, गाईपासून तो सफरचंदांपर्यंतच्या-जशाच्या तशा सांगितल्या त्या लोकांना.



त्या दोघा श्रीमंतांपैकी एक म्हणाला, "खात्रीनं सांगतो. तुम्ही घरी गेल्यावर तुमची बायको तुम्हाला अशी शिव्या देईल की बस. होय ना?"

म्हातारा म्हणाला, "शिव्या देईल? छे, छे, मी सांगतो काय देईल ते. ती मला छानपैकी शाबासकी देईल. वर म्हणेल, आमच्या बाबांचं करणं बाई नेहमीच बरोबर!—"

"काय? पैज माराल आमच्याशी?" दुसरा म्हणाला, "अगदी या इथं! शंभर पौंड वजनाच्या सफरचंदांना शंभर पौंडाच्या सोन्याच्या मोहोरा आत्ताच्या आता नगद ठेवतो मी. समजलात राव!"

शेतकरी म्हणाला, "माझ्याकडे तर अवघी बुशेलभरच सफरचंदं आहेत. एक बुशेलभर सोनं पुरे होईल मला. पैजेचा सौदा मी नि माझी बायको दोघं मिळून करू. बरोबर होईल हे माप मला वाटतं."

तेव्हा त्या विश्रांतिगृहाच्या मालकाने आपली गाडी मागवली. त्यांत ते दोघे श्रीमंत पाहुणे, आणि शेतकरी बसले. भर्र्र्र गेले ते त्या जुन्या शेतमळ्यातल्या घराकडे.

"ठीक आहेना ग सगळं?" शेतकरी शेतकरणीला म्हणाला.

"ठीक आहे ना, बाबा सगळं?" शेतकरीण म्हणाली.

"होतर. मी बदली केली बरं का...." तो म्हणाला.

"खात्री आहे माझी. जरा आराम करा. मग काय झालं ते सांगालच तुम्ही." त्याची पाठ थोपटीत ती म्हणाली.

"घोड्याच्या ऐवजी मी गाय घेतली...."

"देवाचे आभारच बाई! आता जेवताना रोज दूध, नि लोणी नि चीज नेमानं मिळत जाणार, चांगली बदली झाली ही..."

"हो. पण गाय देऊन मी मेंढा घेतला...."

"बाई, जास्तच चांगलं झालं! सगळं कसं सुचतं हो तुम्हाला मी म्हणते! मेंढ्या-पुरतंच जेमतेम गवत उगवतं आपल्या इथं. शिवाय लोकरही मिळेल. मग लोकरीचे गरम मोजे भरपूर होतील आपल्याला. मोज्यांच्या दृष्टीनं गाईचा काय उपयोग? लोकर कुठं असते तिला? कसा एवढा विचार करता तरी?"

"हो पण मेंढा देऊन मी बदक घेतलं"—

"मग बाई, नव्या वर्षाला आपल्याला भाजलेलं बदक खायला मिळणार म्हणायचं. मला आवडेल म्हणून मुद्दाम असं केलंत नक्कीच! मला ठाऊक आहे ते. आपण त्याला दोरी बांधून जरा इकडं तिकडं फिरू देऊंया काही दिवस....मग चांगलं जास्त लठ्ठ होईल ते...."

"हो पण बदक देऊन मी कोंबडी घेतली...."

"अग बाई, झक्कच अदलाबदली झाली म्हणायची. ती अंडी घालील आपल्यासाठी. मग पिलं निघतील त्यातून आणि थोड्याच दिवसांत केवढा कोंबडवाडा तयार होईल इथं. केवढं माझ्या मनात होतं इथं कोंबडवाडा असावा म्हणून...."

"हो पण कोंबडी देऊन मी पोतंभर सफर-चंदं घेतली. वर्षाव जसा त्यांचा—"

"सफरचंदं? अहो, म्हणता तरी काय? मग बाई शाबासकीच दिली पाहिजे हो! कमालच केलीत! खरं ना? आज सकाळी तुम्ही गेलात नि आज रात्रीच्या जेवणाला तुमच्यासाठी काय करू म्हणून विचार करू लागले मी. वाटलं डुकराचं थोडं मांस नि धिरडी करावीत. अंडी नि मांस होतं घरांत पण धिरड्यात भरायला भाजी नव्हती. भाजीसाठी पलीकडच्या गुरुजींच्या घरी गेले जरा....त्यांच्याकडे भरपूर आहे भाजी. पण त्यांची बायको कसली कुसकी! बोलली मात्र गोड हो! मी म्हटलं, "जरा भाजी घाल थोडी उसनी?

तशी ती म्हणाली, 'भाजी देऊ उसनी काही सुद्धा नाही घरात. आमच्या मळ्यातही काही नाही. अहोऽ एखादं कच्चं हिरवं आंबट सफरचंद देऊं म्हटलं तर ते सुद्धा नाही.'

आता मीच तिला एक सोडून दहा देऊ शकेन. काय समजली ती! मिजास नको तिची....सारं पोतं देखील घे म्हणावं. खरंच. हसूच येतं मला तिचं."

असं म्हणत तिने त्या म्हाताऱ्या शेतकऱ्याची लाडाने पाठ थोपटली.

ते बरोबर आलेले नवखे गृहस्थ म्हणाले, "शाब्बास, शाब्बास—काही झालं तरी आनंदच! केव्हाहि इथं येऊन हा आनंद पाहायला मिळण्यासाठी आमच्या पैजेचे पैसे

म्हणजे अगदीच थोडं मोल आहे....कांहीच नाही वास्तविक!...."

त्यांनी मोठ्या खुशीनं एक बुशेल भरून सोन्याच्या मोहोरा लगेच त्या म्हाताऱ्या शेतकऱ्याला दिल्या. शिव्या मिळण्याऐवजी शाबासकी मिळाली होती त्याला! आणि वर त्याची बायको पुन्हा म्हणत होती....

"बाबांचं करणं बाई! नेहमीच बरोबर...."






# डबक्यातला एकच थेंब

सूक्ष्मदर्शक यंत्र म्हणजे काय ते आहे ना ठाऊक? खात्रीने असेल ठाऊक. त्याची काय तर अजबच! एखाद्या वस्तूचा आकार प्रत्यक्षात जितका मोठा असेल त्याच्या शंभर पटीने मोठा करून दाखवीत असते ती!

म्हणूनच एखाद्या डबक्यातला गलिच्छ पाण्याचा एकच—अवघा एकच थेंब घेऊन जर तो सूक्ष्मदर्शक यंत्राखाली धरला तर? तर काय दिसेल?

चमत्कारीक आकाराचे व अक्राळविक्राळ असे हजारो प्राणी त्या एका थेंबात असलेले दिसतील तुम्हाला. पाण्याच्या एका थेंबात हे असे कोणी प्राणी असू शकतील याची तुम्ही कल्पना तरी केली होती?

झुरळासारख्याच पायांची व मिशांची परंतु अनेक पाय व खूप लांब मिशा असलेली बारीक बारीक अशी करंदी नांवाची मासळी असते. एका थेंबातले ते अक्राळविक्राळ प्राणी म्हणजे एकमेकांच्या अंगावर उड्या मारून, इतरांना खाली लोटून आपण स्वतः वर डोकावून पहाणाऱ्या ताटभर करंदीसारखे दिसतात. शिवाय हे छोटे छोटे प्राणी इतके राक्षसी असतात की अगदी



निर्दयपणे एकमेकांच्या मिशा, पाय उपटून फेकून देणे यात त्यांना काहीच वाटत नाही. इतकेच तर काय, पण हे असे करताना ते अगदी आनंदात नि खुशीत असलेले दिसतात!

एकदा असे झाले की एका गावात एक म्हातारा राहात असे. त्याचे शेजारीपाजारी त्याला 'अगडंबगडम्' अशा मोठ्या गमतीदार नावाने हाक मारीत. प्रत्येक गोष्टीतून काहीतरी चांगले तयार करायचे हा त्याचा नेहमीचा उद्योग. आणि जेव्हा जेव्हा त्याला हे सहजपणे करता येत नसे तेव्हां तेव्हां तो काहीतरी जादूचा उपयोग करून ते तयार करी.

एक दिवस अगडंबगडम् असाच एक डबक्यातला थेंब घेऊन आपल्या सूक्ष्मदर्शक यंत्राखाली पाहात बसला. ओ-हो-हो! किती चमत्कारिक दृश्य होते ते! त्या थेंबभर पाण्यात हजारो राक्षसवजा असे बारीकबारीक प्राणी होते. ते एकमेकांच्या अंगावर उड्या मारून वर उसळी घ्यायला पहात होते. एकमेकांचे लचके तोडीत होते—त्यांच्या चिंधड्या उडवीत होते. अगडंबगडम् स्वतःशीच पुटपुटला, "बापरे! किती शहारे आणणारं महाभयंकर दृश्य! पण या सगळ्या राक्षसाना शांत करायला नक्कीच काही तरी उपाय देखील असला पाहिजे."

अगडंबगडम् खूप खूप विचार करीत बसला. पण त्याला उपाय सुचेना. सरतेशेवटी तो म्हणाला,

"या सर्वांना रंग दिला तर. तर हे राक्षस नीट व अधिक स्पष्टपणे दिसू शकतील. मग काहीतरी उपायही शोधता येईल."

मग त्या म्हाताऱ्याने कसला तरी तांबडा छोटासा थेंब त्या डबक्यातल्या थेंबावर टाकला. खरे म्हणजे जादूने भारलेला रक्ताचाच थेंब

होता तो. तो अंगावर पडताच ते सर्व राक्षसी प्राणी अष्टांग तांबडे बनले. जसे लाल रंगाचे राक्षस लोकच! आणि तो डबक्यातला थेंब म्हणजे त्या क्रूर आणि जंगली, लाल राक्षस लोकांचे गावच जसे!

त्या म्हाताऱ्या अगडंबगडम्‌च्या शेजारी दुसरा एक जादूगार बसला होता. या दुसऱ्या जादुगाराचे कधी कोणी नावच ठेवले नव्हते. आणि तो त्याच्या बिननावामुळेच अगडंबगडम्‌पेक्षाही लोकांच्या जास्त लक्षात राहायचा. बिननावाच्या या जादूगाराने न राहावून अगडंबगडम्‌ला विचारले,

"एवढं काय पाहातोस त्या सूक्ष्मदर्शकाखाली?" अगडंबगडम् लगेच म्हणाला,

"काय पहातोय? तूच पहा स्वतः! पहा यात काही ओळखता येत असेल तर. पण मी खात्रीने सांगतो तुला; इतकं सहज कळायचं नाही ते."





त्या निनावी जादुगाराने त्या सूक्ष्मदर्शकाखाली तो थेंब पाहायला सुरुवात केली. तो थेंब म्हणजे एक भले मोठे शहरच दिसले जसे काही! आणि ते सारे राक्षसलोक मारे धूम धावपळ करीत होते. एकमेकाशी झोंबाझोंबी करीत होते. मारामारी करीत होते. लाथाळी करीत होते, एकमेकाना फरपटत होते. खालच्या थरातल्या प्राण्यांना वाटे, आपण वरच्या थरातल्यांच्या डोक्यावर जाऊन बसावे; आणि वरच्या पातळीत असलेल्याना पार रसातळाला लोटून द्यावे. धुमाकूळ घालणारे ते राक्षसी गुंड जणू एकमेकाना म्हणत होते—"पहा, पहा, तो प्राणी आपल्यापेक्षा जरा चांगला दिसतो आहे. तंगडीच खेचूया त्याची. कसा चांगला दिसेल मग! त्याची तंगडी खेचून त्याला मागे ओढला की, आपल्याला नक्कीच पुढे जाता येईल. काय? बरोबर? आणि तो पहा तिथे दुसरा प्राणी. त्याच्या कानाच्या मागे एक बेंड आहे त्याला.

त्याचे व्यंग आहे ते. तसा त्याला त्याचा त्रास नाही. पण आपण त्या व्यंगामुळे त्या प्राण्याला दुखवू शकू. ते बेंड पिरगळू. मग ते असे दुखेल म्हणता. दुखू देत. छान होईल!"

त्या दुष्ट राक्षसांनी त्या बेंडवाल्या प्राण्यावर धाड घातली. त्याचे बेंड पिरगळले, त्याला खूप छळले व शेवटी त्याला ठार केले! कारण एवढेच की त्याला बेंड होते—व्यंग होते—त्याचा तो एक दोष होता! अवघा एकच!



या सर्व थैमान घालणाऱ्या राक्षसांत फक्त एकच प्राणी निराळा होता. एकटाच एका बाजूला बसला होता तो. दिसायला एखाद्या सोज्वळ, छोट्या नम्र देवतेसारखा. सुव्यवस्था शांतता, प्रेमभाव आणि विश्रांति यासाठी मनोमन प्रार्थना करीत होती ती देवता. आसवे ढाळत गहिवरून, हृदय पिळवटून करुणा भाकीत होती. पण इतक्या असंख्य राक्षसात ती एकच देवता! तेव्हा त्यांना आपल्यापेक्षा निराळे असे कुठले आवडायला! त्यांनी त्या देवतेला खसकन् एकीकडे खेचले, तिचे हातपाय धरून तिला खूप फरपटले. आणि क्षणात तिचा नाश केला!

निनावी जादूगार अगडंबगडम्ला म्हणाला,

"अंगावर शहारे आणण्याइतकं महाभयंकर आणि कल्पनातीत रहस्यमय दिसतंय हे सारं!"

अगडंबगडम् चटकन् म्हणाला,


"तुला सुद्धा वाटतंयना महाभयंकर! पण कशाचं चित्र आहे हे सारं? तुला ते ओळखता येतंय की नाही हेच तर मुख्य पाहायचंय मला"


निनावी जादुगार उद्गारला,

"ओळखता येतंय तर काय! मुंबई, दिल्ली, लंडन, कोपनहेगन, न्यूयार्क किंवा तशासारखंच हल्लीच्या जगातलं एखादं मोठं शहर आहे हे. सारी मोठी शहरं सारखीच! दुसऱ्याच्या तंगड्या खेचायच्या, दुसऱ्याच्या व्यंगावर, दोषावर आपली पोळी पिकवायची, आणि दुसऱ्याला उलथून, गाडून टाकून आपण मोठेपण मिळवायचं असे राक्षस सगळ्या शहरांत आहेत."

"आणि डबक्यातल्या पाण्याचा हा एक थेंब म्हणजे, एका शहराचं किंवा या जगाचं हुबेहूब प्रतिबिंबच! खरंना!" अगडंबगडम् म्हणाला.

"शहरातल्या व जगातल्या सर्व भयंकर गोष्टींचं, एकमेकांचा नाश करणाऱ्या सर्व भयंकर माणसांचं–राक्षसांचं हुबेहूब हे प्रतिबिंब! अगदी बरोबर!" तो निनांवी जादुगार म्हणाला.





# अगदी अगदी खरं !

"भयंकरच गोष्ट"....एक कोंबडी म्हणत होती. गावाच्या ज्या भागात ती गोष्ट प्रत्यक्ष घडली त्याच्या अगदी विरुद्ध दिशेच्या भागात राहात होती ती. तिथेच ती इतर कोंबड्यांना सांगत होती आपली गोष्ट. ती पुढे म्हणाली,

"कोंबडवाड्यातली भयंकरच गोष्ट बाई! आपण सगळ्याजणी इथं एकत्र राहातो म्हणून बरं, नाहीतर आपली बुवा एकटं झोपायची हिंमतच नाही आज...."

असे म्हणून त्या कोंबडीने आपली, ती गोष्ट तिथे जमलेल्या सगळ्यांना अगदी अघळपघळ-पणे संपूर्ण सांगितली. ती ऐकून तर तिथल्या सगळ्या कोंबड्यांची पिसे टोकावर तरातरा उभीच राहिली! आणि कोंबड्याचा उभा ताठ लाल तुरा एकदम लुला होऊन खाली

लोंबकळूच लागला! अगदी अगदी खरंच.

असे झाले होते तरी काय ते सुरवातीपासून पाहू या तरी आपण.

गावाच्या दुसऱ्या टोकाच्या कोंबडवाड्यात घडली होती ती गोष्ट. सूर्यास्त झाला. आणि कोंबड्या आपल्या खुराड्याकडे उडाल्या. त्या कोंबड्यांतली एक कोंबडी जरा बुटक्या पायाची नि पांढऱ्या फेक रंगाची होती. ती नेहमी अगदी नियमितपणे अंडी घालायची आणि सरसकटच तिच्याबद्दल इतरांना भारी आदर वाटायचा.

खुराड्यात आल्यावर ती कोंबडी आपल्या फळीवर बसली. सहज तिने आपल्या चोचीने आपले एक पीस पिंजून साफ केले. पण ते पीस सुटावून बाहेरच आले नि उडत उडत ते खाली गेले.

ती म्हणाली "इश्श ! जरासं पीस पिंजलं त्यात एवढं तुटायला काय झालं ? एवढुशाचं का एवढं ! म्हणजे जितकी पिसं मी अशी जास्त उपटेन तितकी मी जास्तच छानदार दिसेन बहुतेक ! ईऽऽ ! काय पण दिसेन मी ! अवतारच !"

अर्थात थट्टेनं नि उपरोधात म्हणाली ती हे सारे. कारण पिसे काढल्यावर छान का दिसणार काही ? कसेसेच दिसणार ते. इतर बाबतीत — एरवी जरी ती भारी गंभीर होती तरी तिथल्या सगळ्या कोंबड्यांत ती भारी थट्टेखोर होती. हे बोलल्यावर काही वेळाने ती गाढ झोपून गेली.

सारीकडे काळोख दाटला होता. ही कोंबडी व तिच्या बाजूची कोंबडी जरी एकमेकींच्या अंगात शिरून गाढ झोपल्या होत्या तरी त्या दोघींच्या पलीकडली तिसरी अजून जागीच होती. तिने त्या पीस गाळलेल्या थट्टेखोर पांढऱ्या कोंबडीचे बोलणे अर्धवट काहीतरी ऐकले होते, नि पुढचे काहीसे ऐकलेच नव्हते. आपण पुष्कळदा करतो असे. पण जे ऐकले ते तिला आपल्या शेजारच्या कोंबडीला सांगितल्या-वाचून काही केल्या राहावेना. सुचेचना. ती म्हणाली,

"ऐकलंस ना तू, मी बाई नावबीव नाही सांगत कोणाचं. पण अशी एक कोंबडी आहे की छान दिसण्यासाठी ती आपली सगळी पिसं उपटून टाकणार आहे म्हणे ! मी जर कोंबडा असते तर ढुंकूनही पाहिलं नसतं तिच्याकडे."

या खुराड्याच्या वरच्याच बाजूला एका फांदीवर एक घुबडीण, तिचा घुबड नवरा नि तिची पिले बसली होती. कान तिखट असल्याबद्दल सबंध घुबडजातीत ते कुटुंब प्रसिद्ध होते. खालची कोंबडी आपल्या शेजार-णीशी जे बोलत होती त्यातला शब्द न् शब्द





त्यांना ऐकू येत होता. त्यांनी लगेच आपले डोळे गरगरवले. घुबडिणीने आपले पंख फड-फडवून वारा घेतला. ती नवऱ्याला हळूच म्हणाली,

"लक्ष नका देऊं तिकडे म्हणा. पण म्हणजे ऐकलंत ना काय ते?—की नाही ऐकलंत? मी बाई प्रत्यक्ष माझ्या कानांनी ऐकलं! त्यांची सगळी पिसं उपटून होईतो अणखीनही काही ऐकू येईल की काय कोण जाणे. ती कोंबडी, आपल्या नावाला बरं दिसेल की नाही याचा विचारही न करता केवळ कोंबड्याला आवडावं म्हणून खुशाल आपली पिसं उपटून टाकते आहे! शर्थ झाली बाई."

घुबड तिला म्हणाले, "श्शSS, अग हळू. निदान मुलांच्या कानावर तरी नको हे जायला." घुबडीण म्हणाली, "पण पलीकडे राहाणाऱ्या त्या घुबडीणबाईला सांगायलाच हवं आपल्याला. आपल्या जातीत केवढा मान आहे तिला." असे म्हणून ती घुबडीण घुबडाबरोबर दूर उडून गेली.

"टुव्हीट टुव्हूSS" आवाज करीत, जाता जाता त्यांच्या अंगणापलीकडच्या कबुतरांच्या खुराड्यात बातमी पोहोचवली त्यांनी. ते म्हणाले,

"ऐकलंत का?....ऐकलंत तरी? टुव्हिट टुव्हूSS.... एका कोंबडीनं म्हणे एका कोंब-ड्याला खूश करण्यासाठी आपली सगळीच्या सगळी पिसं उपटून टाकली. अगदी अगदी खरं! थंडीत जीव जाईपर्यंत कुडकुडणार ती आता. कुडकुडणार काय—आतापर्यंत मेली देखील असेल ती— टुव्हूSS"

"कुठे-कुठे-कुठेSS" कबुतरांनी विचारले. घुबडीण ठसक्यात म्हणाली,

"अहो, समोरच्या अंगणात मी माझ्या डोळ्यानी अगदी प्रत्यक्षच पाहिलं मुळी. आहात कुठं? खरंच बाई! ही गोष्ट सांगायला

सुद्धा काहीतरीच वाटतं. लाज वाटते होऽऽ! पण मी म्हणते ते अगदी अगदी खरंय!"

"खरं?....खऽर्ररं?....शब्द न शब्द?" कबुतरे म्हणाली. त्यांनी सबंध कबुतरजातीत ती गोष्ट सांगितली. कबुतरे म्हणाली,

"कोण्या एका कोंबडीनं म्हणे....कोणी म्हणतात दोन कोंबड्या होत्या त्या—तर त्या दोघींनी इतरांपेक्षा निराळं दिसण्यासाठी नि कोंबड्याला खूश करण्यासाठी आपल्या अंगावरली सगळीच्या सगळी पिसं उपटून टाकली! किती जिवावर उदार होणं हे! समजा, त्यांना सरदी झाली....ताप आला—ताप येऊन त्या मेल्या मग?....हो मेल्याच म्हणतात त्या दोन्ही कोंबड्या!"

कबुतरांना तिथल्या एका कोंबड्याने लगेच साथ दिली.

"कुकरूऽऽकूऽऽ—जागेऽऽव्हा! जागेऽऽव्हाऽऽ" तो कोंबडा मोठ्यांदा आरवला; आणि कुंपणाच्या लाकडी फळकुटावर उडी मारली त्याने. त्याच्या डोळ्यात अजूनही झोप होती. तरीही तो मोठ्याने ओरडत होता.

"एका कोंबड्याच्या प्रेमासाठी तीन कोंबड्यांनी जीव दिला. कुकूरुऽऽकूऽऽ! तीन्ही मृत्युमुखी पडल्या! त्यांनी आपली सगळीच्या सगळी पिसं उपटून काढली होती. भारीच भयंकर —कुकूरुऽऽकूऽऽ!....मला तरीच ही बातमी माझ्या पोटांत ठेवणं अशक्य आहे. अशक्य आहे होऽऽ अशक्य ....! तुम्ही पण कळवा ती चारचौघांना!...."

"कळवा....कळवा.... कळवा होऽऽ ती चार चौघांना." वटवाघळेही एकदम किंचाळली. कोंबड्या जोरात कलकलल्या. कोंबडे मोठमोठ्याने आरवले.


सारे सारे म्हणत होते—

"कळवा....कळवा....कळवा होऽऽ चार चौघांना!"

अशा तऱ्हेने ही बातमी वाऱ्यासारखी पसरत पसरत, या कोंबडवाड्यातून त्या कोंबडवाड्यात, तिथून पुढच्या कोंबडवाड्यात, अशी सगळीकडे पोहोंचली!

सरतेशेवटी ती बातमी प्रथम जिथे सुरू झाली होती तिथेच, त्या मूळ ठिकाणी परत येऊन पोहोचली! तिथे ती कळली ती अशी,

"एका कोंबड्याच्या प्रेमासाठी सर्वांत जास्त कोण झुरत होती हे दाखविण्याकरिता पाच कोंबड्यांनी आपली सगळीच्या सगळी पिसं उपटून टाकली. नंतर त्यांनी एकमेकींना इतके



टोचे मारले की त्या खूप घायाळ होऊन रक्तबंबाळ झाल्या. शेवटी त्या मेल्या देखील! त्यांनी अशा प्रकारे मरून त्यांच्या मालकाचे तर फार मोठे नुकसान केलेच पण आपल्या घराण्यालाही फार मोठा बट्टा लावला...."

ज्या कोंबडीचे ते छोटे पीस सुटावून गळून पडले होते तिने ही गोष्ट आपल्याच बद्दलची आहे हे अर्थातच ओळखले सुद्धा नाही. कारण घरंदाज कोंबडी होती ती. ती म्हणाली,


"शीः! असा तिरस्कार वाटतोय मला त्या कोंबडयांचा! मूर्ख मेल्या! आणखी पुष्कळ कोंबडया आहेत म्हणा अशा! आजकालच्या कोंबड्याच बाई अशा नाचऱ्या नि फाजील! अशा गोष्टीकडे कानाडोळा करणं मुळीच योग्य होणार नाही. ही गोष्ट सरळ वर्तमानपत्रांतच जाहीर करण्याची खूप खटपट करायला हवी मला. साऱ्या खेडोपाडी पसरायला हवी ही गोष्ट. तरच सगळ्या कोंबड्या नि त्यांची कुटुंबं अगदी बरोबर ताळ्यावर येतील."

आणि मग वर्तमानपत्रांत बातमी जाहीर झाली—चक्क छापून आली—

**खरी बातमी—**

अगदी अगदी खरी—

एका चिमुकल्या पिसातून पाच मेलेल्या कोंबड्या सहज तयार होऊ शकतात!!





# जादूचे जोडे

### प्रस्तावना

कोपनहेगन शहरातल्या नव्या मंडईजवळच्या घरापैकी एकामध्ये एकदा आमंत्रित पाहुण्यांचा एक मेळावा जमला होता. त्यातले जवळजवळ निम्मे पाहुणे पत्त्यांच्या डावात रंगले होते. उरलेले पाहुणे जास्तीत जास्त करमणूक करणारा विषय कोणता या वादविवादात गुंतले होते. यजमानीण बाईंनीच सुरू केली होती चर्चा. चर्चा करता करता त्यांच्या वेळच्या काळापेक्षा मध्ययुगीन म्हणजे ४०० वर्षांपूर्वीचा काळ निश्चितच जास्त चांगला


होता असे काहींनी प्रतिपादन केले. त्यात, कोपनहेगनचा न्यायमंत्री श्री. नॅप याने तर या बाजूने आपले मुद्दे इतके जोरदारपणे मांडले की, खुद्द यजमानीणबाईंनीही आपले मत सोडून त्याचे म्हणणे कबूल केले! त्या न्यायमंत्र्याने ठासून जाहीर केले की, पंधराव्या शतकाच्या शेवटी होऊन गेलेल्या हॅन्स राजाच्या वेळचा काळ, म्हणजे पूर्वीचा काळ, हा निश्चितच त्यांच्या एकोणिसाव्या शतकापेक्षा अत्यंत सुखाचा आणि सर्वोत्कृष्ट काळ होता!

वाचक! ही चर्चा इथेच सोडूया आणि या दालनाच्या बाजूच्या खोलीत जरा जाऊया. ही खोली काठ्या, लाकडी जोडे, पायघोळ कोट वगैरे वस्तू ठेवण्यासाठी वापरतात. या पहा इथे दोन स्त्रियाही बसलेल्या दिसताहेत—एक तरुण नि दुसरी वयस्क! प्रथम आपल्याला वाटेल की आपल्या मालकिणींना घरी न्यायला आलेल्या या कोणी मोलकरणी असाव्यात. परंतु निरखून पाहिल्यावर त्या थोर व खानदानी घराण्यातल्या स्त्रिया वाटतात. त्यांचे हात नाजुक व त्यांची कांति राजबिंडी वाटते. हावभाव राजघराण्यातल्यासारखे आकर्षक व भारदस्त वाटतात—खरे म्हणजे त्या दोघीहि पऱ्या आहेत.

तरुण परी ही मुख्य परी नव्हती. ती 'नियती' या मुख्य परीचे शयनागार सांभाळणाऱ्यांची मदतनीस परी होती. दुसरी जी होती ती काहीशी उदास दिसत होती. तिचे नांव '**चिंता**'. ती आपल्या गोष्टींची व्यवस्था सदैव स्वतःच बघायची; कारण त्यामुळेच, काही कशात चुका राहाणार नाहीत याची तिला खात्री वाटे.

त्या दिवशी त्या कुठेकुठे गेल्या होत्या याबद्दल त्या एकमेकींशी बोलत होत्या. नियतीच्या मदतनीस परीने काही किरकोळच हकीकत सांगितली. तिची सर्वांत शेवटची व विलक्षण प्रकारची हकीकत अजून प्रत्यक्ष पुढे घडणार होती.

ती म्हणत होती,...."आज माझा वाढदिवस आहे. त्या निमित्तानं मला आज नियतीकडून लाकडी जोड्यांचा एक जोड देण्यात आला आहे. आणि तो मला मानवापैकी कोणाला तरी द्यायचा आहे. या जोडयांमध्ये अशी दैवी शक्ति आहे की, जो ते घालील त्याला इच्छेप्रमाणे लगेच सर्व मिळेल. स्थल, काल, आणि परिस्थितीबद्दलची त्याने मनात आणलेली



कोणतीही इच्छा पूर्ण होईल; आणि असा हा वर मिळालेला मानव संपूर्णपणे सुखी होईल.—"

**चिंता** म्हणाली, ' छे. उलटपक्षी तो अतिशय दु:खी होईल. जो क्षण तुझ्या त्या जोडयांच्या तावडीतून त्याला मुक्त करील त्या क्षणाला तो अनेक धन्यवाद देईल. लक्षात ठेव माझे शब्द."

नियतीची मदतनीस परी म्हणाली, "अग, हे तुझं मत झालं. पहाच आता तू. हे जोडे इथं मी या दाराशी ठेवते. इतक्यातच कोणी तरी येऊन ते पायात घालील आणि मग बघ त्याचं भाग्य."

### *आश्चर्य १ ले*

## न्यायमंत्र्याचे भाग्य

मेळावा संपला. खूप उशीर झाला होता. हॅन्स राजाच्या वेळच्या जुन्या मनोरम काळाबद्दलच्या विचारातच तो न्यायमंत्री अजून मग्न होता. तसाच मग्न असताना तो न्यायमंत्री श्रीयुत नॅप तिथून आपल्या घरी जायला निघाला. आपले जोडे घालण्यासाठी तो त्या बाजूच्या खोलीत आला.

दैववशात, '**जुन्या काळत मी असतो तर!**' या विचारातच आपल्या स्वत:च्या जोड्याऐवजी चुकून त्याने ते नशीब पालटणारे जोडेच नेमके घातले आणि तो बाहेर ऑस्टर रस्त्यावर आला. जोडयांची अद्‌भुत शक्ती त्याला त्याच्या इच्छेप्रमाणे त्याच्या विचारातल्या व त्याला आवडणाऱ्या पंधराव्या शतकात —पार मागे घेऊन गेली! तेव्हांच्या परिस्थितीप्रमाणे रस्त्यावर साचलेल्या चिखल आणि घाणीच्या ढिगाऱ्यात त्याचे पाय रोवले जाऊ लागले. त्या काळातल्या रस्त्यावर दगडी फरसबंदी केलेली नसे.

न्यायमंत्री म्हणाला, "किती गलिच्छ किळसवाणी घाण आहे या इथे!....हे काय? पायफरशाही कशा नाहीशा झाल्या? नि दिवेही गेले! कमालच झाली!—"

थोडाबहुत प्रकाश मिळावा म्हटले तर चंद्रही अजून उगवलेला नव्हता. हवा कुंद होती आणि मंत्र्याला सभोवतीची प्रत्येक वस्तू धुक्याने वेढलेली नि अंधुक दिसत होती. व्हर्जिन मेरीच्या प्रतिमेपाशी रस्त्यावरल्या एका कोपऱ्यात एकुलता असा एक दिवा मिणमिणत होता. इतका अंधुक की, प्रत्यक्ष त्या दिव्याच्या बरोबर खाली येण्याआधी तो दिवा लक्षातच आला नाही त्या मंत्र्याच्या. दिव्याखाली येताच मेरीची रंगित आकृती त्याच्या नजरेस पडली.

मध्ययुगात रूढ असलेल्या वेषात दोन माणसे त्याच्याजवळून पुढे गेली. तो म्हणाला, "किती विचित्र कपडे केले आहेत यांनी! तमाशात काम करून त्याच पोशाखात परत जाताहेत वाटतं!"

इतक्यात त्याला नगाऱ्यांचे नि कर्ण्यांचे ध्वनी ऐकू आले. मशालीचा झगझगाट दिसू लागला आणि एक विचित्र मिरवणूक चाललेलीही आढळली. त्यात प्रथम सुमारे दहा बारा ताशेवाले आले. त्यानंतर धनुष्यबाण हाती घेतलेले शेतकरी आले. त्या जमावाचा प्रमुख, अत्यंत गंभीर वाटेल असा पोषाख केलेला एक धर्मोपदेशक होता! आश्चर्याने थक्क होत, हे



'काय सर्व!' म्हणून न्यायमंत्री त्या लोकाना विचारू लागला आणि धर्मोपदेशकाच्या नावागावाची चौकशी करू लागला.

"झीलंडचे धर्मगुरु आहेत हे" त्याला जबाब मिळाला! "बापरे म्हणजे या धर्मगुरूला आज झालंय तरी काय?" मंत्री आश्चर्याने म्हणाला. "—झीलंडचा धर्मगुरु खात्रीनं नसावा हा. कारण तो तर भारीच चमत्कारिक स्वभावाचा आहे. शिवाय त्याच्याबद्दल गावात अनेक गमतीदार गोष्टी ठाऊक आहेत लोकाना. तो असा रस्त्यातून जाईलच कसा–"? म्हणून तो न्यायमंत्री घाबरून गेला बिचारा! तावडतोब जरा मान उजवीकडे किंवा डावीकडे न वळविता थेट पूर्वमार्गावरून राजवाड्याच्या चौकाकडे जाणाऱ्या पुलाकडे वळला तो मंत्री!

अरेच्या! पण तिथून राजवाड्याच्या चौकाकडे जाणारा तो पूलच तर कुठे दिसेना! त्याऐवजी कुठलेतरी घाणेरडे पाणीच पाणी! आणि त्यात दोन माणसे अगदी सुस्तपणे आपली होडी टाकून बसलेली असे विचित्र दृश्य त्याच्या दृष्टीस पडले. त्या दोघांनी त्याला विचारले, "या, या, साहेब—पलीकडे होम गावी जायचंय का?" "काय म्हणालात हो मला? छे छे! ख्रिस्तधामला जायचंय नि मग छोट्या बाजाराच्या रस्त्यावर–" मंत्री म्हणाला. त्या बिचाऱ्या मंत्र्याला हे आपण कुठल्या काळातले दृश्य पाहातो आहोत याची कल्पनाच होईना! आणि ती माणसे मात्र त्याच्याकडे मारे हा असा काय बोलतो, कुठले ख्रिस्तधाम वगैरे असे म्हणत चमत्कारिकपणे पाहू लागली!

न्यायमंत्री अगदी अजीजीने त्याना म्हणाला, "इथं राजवाड्याच्या चौकाचा पूल कोणीकडे आहे तेवढं जरा सांगाल काहो? इथं दिवेसुद्धा लागलेले नसावेत ही खरोखरी केवढी लाजिरवाणी गोष्ट आहे. आणि हा चिखल?—जणू एखाद्या दलदलीतूनच चालल्यासारखं वाटतंय." तो त्या नावाड्यांशी जितका जास्त बोलायचा तितके त्या दोघांचे बोलणे समजायला त्याला कठीण जायचे. शेवटी वैतागल्या सारखा होऊन नि त्यांना शिव्या देत तो तिथूनच पाठी पळाला. त्याला पूल किंवा त्याचा कठडा काहीच दिसेना कुठे! "भलत्याच अनवस्थेत दिसतोय बाजाराचा हा भाग तर! इतकी अव्यवस्था–"? तो कुरबुरला. मग त्याने विचार केला, एखादी गाडी करूनच घरी जावं. पण गाड्याच कुठे होत्या? एक म्हणता एकही गाडी दिसेना!

"मला वाटतं नव्या मंडईकडे परत जावं. तिथं नेहमी असतात गाड्या. तिथं तरी मिळेल

का गाडी! गाडीशिवाय ख्रिस्तधामचा रस्ता सांपडणारच नाही मला!"

तो पूर्व मार्गावरून पुन्हा परत आला. इथे रस्त्याच्या शेवटाला येतो तोच आकाशात चंद्र ढगाबाहेर आला. त्या स्वच्छ प्रकाशात पूर्वे-कडील उंच नि भलेमोठे फाटक–पूर्वी ते पूर्व रस्त्याच्या शेवटी असल्याने–त्याला दिसले. "हे उभे सुळासारखे खांब नि हे लाकूडकाम कशासाठी आज इथं!" तो म्हणाला. तोच त्याला एक छोटेच फाटकाच्या बाजूचे दार उघडे दिसले. यातून पलीकडे जाताच हल्लीच्या नव्या मंडईजवळ तो आला असे त्याला वाटले. परंतु मंडईऐवजी एक भले मोठे पडीत हिरवे मैदान दिसले त्याला! मधे एखाददुसरे झुडूप उगवले होते आणि थेट आरपार एक पाण्याचा पाट की नदी वाहात होती. नदीच्या पलीकडच्या काठी, चिखलात डच खलाशासाठी तात्पुरती मांडलेली छोटी छोटी नि तुरळक लाकडी चौक्यांची दुकाने दिसत होती आणि त्यामुळे त्या सगळ्या भागाला डच कुरण असे नाव होते.


"हा एखादा दैवी चमत्कार तरी असावा नाहीतर मला मद्याची खूप नशा तरी चढली असावी की वेड तरी लागलं असावं!" हताश होऊन तो न्यायमंत्री म्हणाला. "काय झालंय तरी काय मला हे सारं?–झालंय तरी काय?" तो तिथूनही परत फिरला. "आपण काहीतरी एकाएकी खूप आजारी तर झालो नसूं?" त्याला वाटले. त्याने तिथली घरे निरखून पाहिली. तेव्हा त्याला आढळून आले की ती बहुतेक लाकडी होती आणि बऱ्याचशा घरांची छपरेही गवती होती!

"अरेरे! मला अगदीच बरं वाटेनासं झालंय! वास्तविक पंचमद्याचा फक्त एकच–अवघा एकच पेला घेतला होता मी—पण पण–पंच माझ्या प्रकृतीला कधीच जमले नाही–भारी चुकलंच त्यांचं की गरम गरम सामन माशांबरोबर पंच मद्य प्यायला द्यायचं! ती यजमानीण त्या–कमिशनरची बायको मला पुन्हा भेटली की अगदी पहिल्यांदा खरड काढेन तिची. आताच जाऊन माझे हे हाल सांगू का तिला वर्णन करून?"

त्याने ते कमिशनरीण बाईचे घर शोधण्याचा प्रयत्न केला पण तिथे दिसेचना ते!

"आता मात्र भयंकरच झालं हे" तो न्याय-मंत्री अतिशय घाबरून म्हणाला. "पूर्व मार्गही ओळखायला येत नाही मला; दुकानेही दिसत नाहीत इथे. फक्त पडलेली नि मोडकळलेली घरे. खूप खोल खोल खड्डे मात्र आहेत. जणू हा गावाचा एखादा मागासलेला भिकार भाग. खरोखरीच मी फार आजारी झालो आहे. कमिशनराच्या घरीच गेलं पाहिजे मला. पण–पण त्याचे ते घर आहेच कोणीकडे? वास्तविक या इथंच असायला पाहिजे ते! इथं तर निदान तशासारखं दिसणारं देखील घर नाही! एका रात्रीत एवढं सारं बदललं तरी कसं?"

त्याला एका घराचे एक दार अर्धवट उघडे दिसले. त्यातून आतला मंद उजेड पाहिला त्याने. त्या काळातील विश्रांतिगृहांपैकी एक विश्रांतिगृह होते ते. शिवाय मदिरागृहही होते ते. दारातून आत जाताच ती एक मोठीशी खोली असल्याचे आढळले त्याला.



पुष्कळसे लोक होते तिथे. कोणी खलाशी तर कोणी कोपनहेगनचे व्यापारी. शिवाय उच्चवर्गीय पेशातले दोघेतिघे जणही होते त्या लोकांत. ते सारे त्यांच्या मद्य भरलेल्या पत्र्यांच्या पेल्यांवरच आवेशपूर्ण संभाषण करण्यात इतके गुंतले होते की हा नवखा माणूस आत शिरलेला लक्षातच आला नाही त्यांच्या. त्याचे स्वागत करायला पुढे झालेल्या मालकीणबाईला न्यायमंत्री म्हणाला, "ख्रिस्तधामला जायाला एक गाडी आणवून देण्याची कृपा कराल का जरा. मी एकाएकी फार आजारी झालोय हो! म्हणून म्हणतो—"

ती बाई आश्चर्यभरात डोके हलवीत नि डोळे तारवटून त्याच्याकडे पाहातच राहिली. मग ती जर्मन भाषेत त्यच्याशी बोलू लागली. तिला डेनिश येत नसावे असे वाटून न्यायमंत्र्याने जर्मन भाषेत पुन्हा तिला विनंती केली. यामुळे नि त्याच्या निराळ्या तऱ्हेच्या पोषाखामुळे तिची कल्पना झाली की तो कोणी परदेशीच माणूस असावा! त्याला बरे नाही असे पाहून तिने त्याच्यासाठी एक कळशीभर पाणी आणले तोंड धुवायला.

न्यायमंत्र्याने आपले डोके आपल्या दोन्ही हातांत गच्च दाबून धरले. आणि तो झालेल्या सबंध विचित्र घडामोडींचा नि भोवताली दिसणाऱ्या सर्व चमत्कारिक गोष्टींचा विचार करू लागला.

ती मालकीणबाई एक वर्तमानपत्राची घडी बाजूला एकीकडे सारीत होती. तो तिला म्हणाला, "आजचे वर्तमानपत्र आहे का ते?" तिने काहीच उत्तर न देता ती वर्तमानपत्राची घडी त्याला दिली. त्या वर्तमानपत्राच्या घडीत एका लाकडावर रंगविलेले एक चित्र होते. त्यांत 'कोलॉं' शहरात थोड्याच दिवसांआधी दिसलेल्या धूमकेतूचे चित्र होते.

ती जुन्या काळातली वस्तू पाहून मंत्र्याला खूप गंमत वाटली. "फार जुने चित्र आहे हे. तुम्हाला कसं काय मिळालं ते? फार मजेशीर देखावा आहे हा. नॉर्वेमधल्या आरोराबोरिअॅलिसचंच हुबेहूब प्रतिबिंब. विद्युत्प्रवाहामुळेही हे धूमकेतू तयार होतात असा आता शोध लागला आहे." मंत्री जर्मनमधे म्हणाला.

तिथे बसलेल्यांपैकी ज्यांनी त्याचे बोलणे ऐकले ते आश्चर्याने त्याच्याकडे टकामका पाहातच राहिले! एकाने मोठ्या आदराने आपली हॅट काढून त्याला अभिवादन केले नि म्हणाला, "महाराज, आपण तर निस्संशय कमालीचे विद्वान दिसता आहात!" न्यायमंत्री म्हणाला, "छे,छे. म्हणजे आपलं सर्वसाधारण गोष्टीबद्दल अगदी थोडंसच माहीत आहे मला.



...हल्लीच्या काळात असावंच लागतं...."

त्या गृहस्थाने उत्तर दिले, "विनय हा नेहमी सद्गुणच असतो. पण आपली विद्वत्ता खात्रीनं गाढ आहे...."

न्यायमंत्री म्हणाला, "आपलं नांव कळेल का मला...." आपली मान ताठ करीत तो गृहस्थ म्हणाला, "मी वेदांताचा पदवीधर आहे."

हे उत्तर मंत्र्याला पटले, कारण त्याचा पोशाखही त्याच्या विषयाला साजेसा होता. मंत्र्याला वाटले, "एखाद्या बिनसुधारलेल्या खेड्यातले एक जुने सनातनी शिक्षक आहात का आपण? कारण ज्यूटलंड भागात तसे अजूनही आढळतात –"

"खरं आहे ते" तो वेदांती म्हणाला. "परंतु मी तरीही विनंती करतो की, आम्हांला काहीतरी ज्ञानदान करावं. आपण प्राचीन शास्त्र पुराणे, वेदांत यावर खूपच वाचलेलं दिसतंय !"

"हो तर. मला जुनी जुनी विशेषतः उपयुक्त लिखाणं वाचायला नि अभ्यासायला फारच आवडतात. हल्लीच्या त्या थिल्लर कादंबऱ्या मात्र मुळीच आवडत नाहीत."

"असं असं" तो वेदांताचा पदवीधर हंसत म्हणाला. "पण त्यात भरपूर विनोदही असतो. आणि राजेरजवाड्यात तर भारीच वेड आहे त्यांचे. स्वतः राजाला तर सर आयवेन नि गावेन यांची पुस्तके––ज्यांत आर्थर राजा नि त्याचे गोलमेज सरदार यांच्या गोष्टी आहेत– त्या फार आवडतात. तो अनेकदा आपल्या मुख्य सरदारांबरोबर त्यावर चर्चा, थट्टाविनोद देखील करतो."

न्यायमंत्री म्हणाला, "ती रोमांचकारी कथा मात्र मी अजून वाचली नाही. अगदी नवी असली पाहिजे ती. हेबर्गनं प्रसिद्ध केली का ती?"

जुन्या हॅन्स राजाच्या वेळचा तो वेदांती उद्गारला, "छे छे. ते पुस्तक तर गॉडफ्रॉइड नि गेहमेन यांनी प्रसिद्ध केलं आहे !"

मंत्री म्हणाला, "पण हे तर फार जुनं नांव आहे. मला नक्की आठवतंय की डेन्मार्कमधला पहिला छापखाना त्याचा."

तो पदवीधर म्हणाला, "हो हो, तोच आपला पहिला मुद्रक." इथपर्यंत सारे ठीक


क्रमांक 65503 दि. ता. ता.
3640 30/3/1969

होते. इतक्यात काही वर्षांपूर्वी शेजारच्याच भागात कशी आपत्ती आली वगैरे विषयावर एक व्यापारी बोलू लागला.

आणि चर्चेत खूपच वादंग माजले. कारण त्यांत दोन्ही काळच्या प्रसंगांचा मेळच बसेना! काहीच गोष्टी एकमेकींशी जुळेनात! कारण ते लोक होते १५ व्या शतकातले आणि मंत्री होता त्यांच्यापेक्षा ४०० वर्षांनी पुढे म्हणजे १९ व्या शतकातला! आपापली मते समजावून सांगण्याची सर्वांनी शिकस्त केली, पण एकूण शेवट भांडणातच होऊ लागला! तो व्यापारी मारे संतापला होता न्यायमंत्र्यावर! वेदांताचा पदवीधर अखेरीस आपले म्हणणे नीट समजावण्यासाठी लॅटिन-मधेही बोलला पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. तितक्यात त्या खानावळीच्या मालकिणीने मंत्र्याची बाही ओढून विचारले, "आतां कसं वाटतंय तुम्हाला? अगदीच बरं नव्हतं मघाशी." आणि या प्रश्नाने तो एकदम शुद्धीवर आला; कारण संभाषणाच्या तावातावात, त्याला जे झाले होते ते तो साफ विसरला होता.

डोके सुन्न होत तो उद्गारला, "खरंच, मी आहे तरी कुठे?" क्षणभर त्याला भयंकर गरगरल्यासारखे वाटले. "क्लॅरेट मीड आणि ब्रेमेन बीअर मद्येच घ्यायला हवी आपल्याला." त्यांच्यांतला एकजण पटकन म्हणाला, "आणि बरं का, आमच्याबरोबर घेतलीच पाहिजेत हं. तुम्हाला." त्याने वाक्य पूर्ण केले.

मेजवानीच्या वेळच्या पोशाखात दोन मुली बाहेर आल्या आणि त्यांनी सर्वांना अभिवादन करून मद्याचे पेले भरायला सुरवात केली. बिचाऱ्या न्यायमंत्र्याच्या अंगातून गारगार शिरीशिरी गेली. सर्वांगाला घाम सुटला



त्याच्या. "काय, आहे तरी काय हे सारं?" तो कळवळून म्हणाला.

तो आजपर्यंत या असल्या मागासलेल्या नि हलक्या लोकांत कधीच वावरला नव्हता. "जुना दैत्यांचा काळ परत आला की काय! भयंकर प्रसंग आहे माझ्या आयुष्यातला हा." तो मनात म्हणाला. पटकन त्याच्या डोक्यात आले, आपण हळूच टेबलाखाली शिरावे आणि सरपटत, लपतछपत पटकन दारातून बाहेर पसार व्हावे. तसे करत करत तो थेट दाराशी आला देखील. पण तोच तिथल्या एकाच्या दृष्टीस पडला तो! त्याचा हेतू कळताच लोकांनी धावत जाऊन त्याच्या तंगड्या धरून त्याला मागे खेचले आणि त्यासरशी ते गहजब उठवणारे जोडे पटकन त्याच्या पायातून खाली पडले! ते पडताच तिथला तो देखावाही नाहीसा झाला!!

आता न्यायमंत्र्याच्या पुढ्यात रस्त्यावर एक झगझगीत दिवा जळत होता. त्या दिव्यामागे एक मोठे थोरले घर उभे होते. प्रत्येक वस्तू ओळखीची दिसू लागली! ऑस्टर मार्गच होता तो—थेट आधीच्यासारखा! मंत्री फुटपाथवर पडलेला होता. त्याचे पाय आपटत होते. आणि त्याच्यासमोरच गस्तवाला पहारेकरी बसल्या-बसल्या गाढ झोप घेत होता! मंत्री म्हणाला,

"अरेच्या! मी इथं भररस्त्यात पडल्या-पडल्या स्वप्नंच पाहात होतो वाटतं! हो, बरोबर, ऑस्टर मार्गच आहे हा—केवढा छान उजेड असलेला नि किती व्यवस्थित! केवढं मोठं आश्चर्य म्हणायचं की पंच मद्याच्या अवघ्या एका पेल्याचा आज एवढा परिणाम व्हावा माझ्यावर?"

दोनच मिनिटांनंतर तो एका गाडीत बसून ख्रिस्तधामकडे निघाला. आधीचे गोंधळ नि हाल आठवताच प्रत्यक्ष वस्तुस्थिती पुन्हा मिळाल्याबद्दल मनापासून देवाचे आभार मानले त्याने. त्याला आता पुरेसे पटले की, ज्या पूर्वीच्या काळात तो गेला होता त्यापेक्षा चालू काळच—त्यात उणीवा असूनही केवढा तरी चांगला होता!!

### आश्चर्य २ रे

## गस्तवाल्या पहारेकऱ्याच्या साहस कथा

वरच्या गोष्टीतला गस्तवाला पहारेकरी आपल्या गाढ झोपेतून जागा होता होता म्हणाला, "अरेच्या, इथं जोड्यांचा एक जोड दिसतोय! इथं वरती राहाणाऱ्या सैन्याधिकाऱ्याचा असावा नक्कीच, कारण त्याच्याच दाराशी पडलाय तो...."

त्या नेक पहारेकऱ्याला प्रथम वाटले, सैन्याधिकाऱ्याच्या दाराची घंटा वाजवावी आणि त्याचे त्याला नेऊन द्यावे ते जोडे, कारण त्याच्या खोलीत अजूनही दिवा होता. परन्तु दाराची घंटा वाजताच घरातली सारी माणसे जागी होतील या भीतीने त्याने तसे केले नाही.

"ही असली उपकरणे वापरण्याने खूपच आराम आणि ऊब मिळत असेल नाही...." तो स्वतःशीच म्हणाला. "अरे वा! किती मऊ नि सहज ताणले जाणारे आहेत हे!" तो ते जोडे पायात घालून पाहात पुटपुटला. जोडे त्याच्या पायाला इतके बरोबर झाले की ते जणू त्याच्यासाठीच खास बनवले असावेत.



तिथे त्याला अगदी विनायास नि आरामात जेवणही मिळते. खरंच! **जर त्याचे भाग्य मिळाले तर!**

त्याच्या ओठातून ही इच्छा निघताच त्या जोड्यातली जादूची शक्ती जागृत झाली. आणि त्या पहारेकऱ्याचा आत्मा त्या येरझारा घालणाऱ्या सैनिकाच्या शरीरात शिरला! तो पहारेकरी आता सुंदर सजवलेल्या दालनात सैन्याधिकाऱ्याच्या रूपात उभा होता. त्याच्या हाताच्या बोटात त्याने एक नाजूक, गुलाबी रंगाचा छोटा कागद धरला होता. त्यावर एक कविता लिहिली होती. त्या अधिकाऱ्याने पुढीलप्रमाणे स्वतःच रचली होती ती कविता!

"झालो जर मी धनिक कधी तर"...

*झालो जर मी धनिक कधी तर!....*
*—म्हणत असे मी बालपणीच्या सवंगड्यांना.*
*झालो जर मी धनिक कधी तर—*
*गणवेष झक्क अन् तुरा टोपिवर,*
*लटकवुनी तलवार कटी मी,*
*बनेन सेनापति मी नामी!*
*जाता वर्षे बनली इच्छा खरी!*
*खचितच बनलो मी अधिकारी...*
*झालो नाही पण लक्ष्मीधर.*
*अलबत बनलो मी लक्ष्मीधर...*
*परंतु, मिळवुन विपुल संपदा—परीकथांची!*
*अगणित माझ्या परीकथांवर लुब्ध होउनी*
*भंवती माझ्या घुटमळली अन् बाला कोणी!*
*माझीही त्या किशोरीवरी प्रीती जडली,*
*अपार माझी कथा-संपदा जिने वांछिली.*
*'वियोग देवा तिचा न दे' प्रार्थिले त्रिकाली—*

"हे जग किती मजेदार आहे" तो विचार करीत होता. "आताच पहाना. त्या सैन्याधिकाऱ्याला आपल्या गादीत अगदी बऱ्याच आधी गुडुप झोपायला हरकत नव्हती. पण इतकं असून तो यावेळी जागा आहे! इकडून तिकडे येरझारा घालतो आहे! वास्तविक किती सुखी माणूस आहे हा. 'हे आण ते आण' तगादा लावणारी बायको नाही त्याला, की सदा 'भूक-भूक' करणारा मुलांचा घोळकाही नाही मागे. रोज रात्री तो आपल्या मित्रमंडळीत जातो;

*अहह ! प्रार्थना परमेशा रे ? तशीच विरली ?*
*—तुवाच केले कथा-धनिक जर !*

*'धन राशींचा धनिक मला कर'—*
*पोचविली मी हाक कितीदा स्वर्गादारी !*
*पहात असतो रोज विकसता मुग्ध किशोरी,*
*सुडौल, शालिन, सूज्ञ, सुंदरी !*
*प्रितिभरित नयनांनी का परि बाला पाही*
*शब्द शब्द जे खोल कोरले माझ्या हृदयी ?*
*कधी तिने सहभागी होउन*
*अनुभविले मम हृदिचे स्पंदन ?*
*छे छे ! आशा नाशवती पण !*

*आज एकटा मुकाट जगतो–विनाशलेला !*
*किन्तु यातना मनिची देवा ! कळो ना तिला....*



वरच्या काव्यात त्या निर्धन सैन्याधिकाऱ्याच्या जीवनातील एका महत्त्वाच्या घटनेचे नि त्याच्या यातनांचे चित्र दिले आहे. आणि या यातनातही गोड काव्य असते! लोक मात्र अगदी भावनाशून्यपणे म्हणतील, "बाकी सैन्याधिकारी, प्रेम, नि काव्य या गोष्टी एकमेकांना काय पण शोभतात अगदी !"

त्या सैन्याधिकाऱ्याचे दुःख मात्र त्याचे त्याला एकट्यालाच ठाऊक होते. आणि म्हणूनच कविता वाचल्यावर त्याने हताशपणे आपले डोके खिडकीच्या चौकटीवर एका बाजूला टेकून एक दीर्घ निःश्वास टाकला. तो बाहेर डोकावत म्हणाला, "बिचारा तो समोरचा गस्तवाला पाहारेकरी खरंच सुखी! माझ्यासारख्या यातना त्याला नाहीत. त्याला घरदार आहे. त्याच्या दुःखात वाटेकरी होऊन अश्रु ढाळायला नि सुखात हसू उधळायला त्याची बायको व मुले आहेत. त्याचं जीवन जर मला मिळालं तर किती सुखी होईन मी !

**मी जर तो पहारेकरी असतो तर !"**

यामुळे पाहारेकरी पुन्हा पाहारेकरी झाला. जोडयांच्या जादूमुळे त्याचे व्यक्तित्व त्या सैन्याधिकाऱ्यात शिरले होते. पण सैन्याधिकारी जेव्हा फार निराश झाला, नि पाहारेकऱ्याचे जीवन बरे असे म्हणाला तेव्हा पाहारेकऱ्याचे व्यक्तित्व पुन्हा पाहारेकऱ्यात गेले.

पाहारेकरी डोळे चोळीत म्हणाला, "काय घाणेरडं स्वप्न तरी!" तो त्या काळोखात डोळे

तारवटून आकाशाकडे पाहू लागला. तोच एक तारा तुटताना दिसला त्याला. "तो पहा एक तारा पडला." तो म्हणाला, "आणि आकाशात अजून केवढे तरी आहेत. पण या छोट्या छोट्या चकचकत्या वस्तू काय आहेत हे पाहायला पाहिजे एकदा. याहीपेक्षा विशेषतः चंद्राचे निरीक्षण करण्यात खरी मजा. तो जास्त स्थिर वाटतो. माझी बायको ज्या विद्यार्थ्याकडे धुणं धुवायला जायची तो नेहमी म्हणायचा की "जेव्हा आपण मरतो तेव्हा एखाद्या पिसाप्रमाणे हलके होऊन आकाशात उडतो नि एका ताऱ्यावरून दुसऱ्या ताऱ्यावर जातो! या म्हणण्यात काही अर्थ **नाही म्हणा, पण मी मनाने एकदा जरी तिथं उंच उडी मारून चंद्रावर जाऊं शकलो असतो** तर? माझं शरीर खुशाल इथं या दाराच्या पायरीवर असंच राहिलं तरी चालेल मला."

या जगात काही अशा गोष्टी आहेत की त्यांच्याबद्दल बोलताना फार जपून बोलायचे असते, विशेषतः जादूचे जोडे पायात असताना तर फारच जपून! आता हेच पाहाना, केवळ बोलण्यामुळे त्या पाहारेकऱ्याचे पुढे काय झाले ते.

चंद्राचे जवळून निरीक्षण करण्याची इच्छा मनात आणताच आत्म्याच्या रुपात पहारेकरी अवघ्या काहीच सेकंदांत २,४०,००० मैल अंतर तोडून चंद्रावर पोहोचला. आपल्याला ठाऊकच आहे की पृथ्वीपेक्षा चंद्र हलका आहे —नुक्तेच बरसलेले हिमच म्हणाना. आपला पाहारेकरी, चंद्रावरल्या पर्वतांच्या असंख्य रांगांपैकी एकीवर जाऊन पोहोचल्याचे त्याला आढळले. चंद्रावर पर्वत नि डोंगर आहेत हे चंद्राच्या नकाशावरून आपल्याला ठाऊकच आहे. एका डोंगराच्या तळाशी एक शहर दिसले त्याला पहारेकऱ्याला. एखाद्या अंड्यातला पांढरा बलक पाण्यात खूप फेटल्यावर जसा व्हावा तसेच काहीसे भुसभुशीत होते ते शहर. शहरातले मनोरे, आणि वाडे तसेच पारदर्शक असलेले व विरळ हवेत तरंगताना



दिसले त्याला. आपली पृथ्वीतर त्याच्या डोक्यावर आधांतरी लटकत असलेला एक भला थोरला विस्तवाचा गोळाच वाटला जसा!

पाहारेकऱ्याला झटकन प्राण्यांचा एक जमाव आढळला. आपण ज्याना मनुष्यप्राणी म्हणतो त्यातलेच होते ते. पण आपल्याहून फारच वेगळे दिसत होते ते. आपल्याकडच्या एखाद्या चित्रकाराने काढलेले त्यांचे चित्र जर आपण पाहिले असते तर आपण म्हटले असते "काय कमालीचे देखणे अरब लोक आहेत हे!" त्यांची एक भाषाही होती. परंतु आपल्या पाहारेकऱ्याच्या आत्म्याला त्यांची ती भाषा पूर्ण कळणे शक्य नव्हते. तशी थोडी कळलीही असती—कारण आम्हा माणसांच्या आत्म्याना आपण कल्पना करतो त्याहून केवढे तरी अधिक समजण्याच्या काही अपूर्व देणग्या असतात. आपल्या स्वप्नांत पऱ्यांची महाराणी आपल्या जादूच्या शक्तीवर आपल्याशी बोलतेच की नाही. आपल्याला अनेक आश्चर्यकारक नि कल्पनातीत सुंदर दृश्ये दाखवितेच की नाही. वर्षानुवर्षे ज्यांची गांठभेट सुद्धा नाही अशी माणसे आपण मनातल्यामनात आपल्याजवळ उभी करू शकतोच की नाही.

पहारेकऱ्याला म्हणून अर्थात तिथल्या लोकांची भाषा समजली. चंद्रावरचे लोक आपल्या पृथ्वीविषयी वाद घालत होते. पृथ्वीवर प्राणी असणे शक्य आहे की नाही याबद्दल शंका होती त्याना. त्यांचे म्हणणे असे की पृथ्वीवरची हवा कमालीची जड असल्याने प्राण्यांना श्वासोच्छ्वास करणे शक्यच कसे होईल? फक्त चंद्रावरच प्राणी असणे शक्य आहे. इतकेच काय पण सर्व ग्रहमालेच्या केंद्र-भागी चंद्रच असावा! सूर्य नसावा. चंद्रावरच फक्त भिन्न भिन्न प्राणी गुण्यागोविंदाने राहू शकतात! चंद्रलोकाच्या किती विचित्र कल्पना! ऑस्टर मार्गावर त्या पाहारे-कऱ्याच्या शरीराचे काय झाले ते आता पाहू या. त्या पायरीवर निर्जीव पडला होता त्याचा देह. त्याचा दंडा त्याच्या हातातून खाली पडला होता. त्याचे डोळे चंद्राकडे रोखलेले होते. स्वैर प्रवास करीत असलेल्या त्याच्या आत्म्यावर ते पाळत ठेवत होते!

'किती वाजले हो पाहारेकरी' एक वाटसरू दोनचार मित्रांबरोबर जाता जाता म्हणाला. प्रत्युत्तर न मिळाल्याने पाहारेकरी गारठला असे वाटले त्याला. ऊब आणण्यासाठी त्या पाहारेकऱ्याचे नाक चोळण्याचा तो प्रयत्न करू लागला. तोच तोल सुटून पाहारेकऱ्याचा देह जमिनीवर कलंडला! त्या सर्व जणाना जे आश्चर्य वाटले नि जी धडकी भरली म्हणता! पाहारेकरी मेला होता हे तर निश्चित झाले! पोलिसांना बोलावण्यात आले आणि तो देह पहाटेपर्यंत हॉस्पिटलमध्ये पोचविण्यात आला.

आता तो चंद्रावर गेलेला पाहारेकऱ्याचा आत्मा जर पुन्हा खाली येऊन रस्त्यावर आपल्या देहाला शोधू लागला असता तर त्याला तो सापडलाच नसता.

पाहारेकऱ्याचा देह फ्रेडरिक हॉस्पिटलमध्ये आणल्यावर तिथली पहिली गोष्ट म्हणजे त्याच्या अंगावरले कपडे काढायचे. साहजिकच पहिल्या-प्रथम त्याच्या पायातले जोडे काढण्यात आले!

तों तत्क्षणीच तऱ्हतऱ्हेच्या साहसासाठी बाहेर गेलेल्या त्याच्या आत्म्याला एखाद्या विद्युत्-प्रवाहाप्रमाणे अगदी झटकन या जगातल्या वास्तव्यासाठी त्या देहात येणे प्राप्त होते. पाहारेकऱ्याचा आत्मा सरळ त्याच्या देहापुढे आला आणि अवघ्या काही क्षणातच पाहारेकऱ्यात संपूर्ण चैतन्य आले! पाहारेकरी बसत बसत म्हणाला, "काय भयंकरच रात्र गेली माझी, पुन्हा कितीहि पैसे मला देऊ केले तरी असल्या विचित्र विचारात भरकटायला नि पिसाट भटकायला मी कधीच तयार होणार नाही. छे! छे!"

साफ बरा असल्याचा आपला दाखला मिळवून हॉस्पिटलमधून त्याच दिवशी घरी आला तो. आणि?

आणि त्याचे जोडे मात्र हॉस्पिटलमध्येच राहिले!!

*आश्चर्य ३ रे*

## एकविलक्षण क्षण—अत्यंत विचित्र प्रवास.

फ्रेडरिक हॉस्पिटलचे प्रवेशद्वार कशा पद्धतीचे आहे ते कोपनहेगनच्या प्रत्येक रहिवाशाला ठाऊक आहे. तरीपण इतरानाही त्याची कल्पना यावी म्हणून थोडे वर्णन देत आहे.

रस्त्यालगत हॉस्पिटलच्या सभोवती एक लोखंडी कांबींचे कुंपण आहे. त्या जाड लोखंडी कांबी खूप विरळ आहेत. इतक्या की एखादा किडकिडीत शिपाई त्यातून तसा धडपडत आतबाहेरही जाऊ शकेल आणि हॉस्पिटलच्या वेळातही गुपचूप आपल्या ओळखीच्यांना भेटून येऊ शकेल! माणसाच्या शरीरापेक्षा डोके बाहेर निघणे कठिण असते. अर्थात् ज्यांची डोकी लहानसर असत त्याना या कांबींतून बाहेर पडतां येई.

त्या हॉस्पिटलमधल्या भले थोरले डोके असलेल्या एका स्वयंसेवकाला, त्या संध्याकाळी कामाची पाळी होती. पाऊस मुसळधार कोसळत होता. त्याला तशा पावसातही पटकन जरा बाहेर एका ठिकाणी जाऊन यायचे होते. उगाचच तिथल्या दरवानाला ते कळू देणे त्याला पसंत नव्हते; म्हणून कांबींच्या फटीतूनच त्याला बाहेर सटकायचे होते.

आता आपल्या पाहारेकऱ्याचे जोडे तिथे तसेच बेवारशी पडले होते. स्वयंसेवकाला वाटले की अशा पावसात ते घातलेले फार बरे. त्याने ते पायांत घातले. त्याला शंका एवढीच होती की त्या कांबींच्या फटीतून तो बाहेर पडू शकेल की नाही?

कुंपणाजवळ उभा राहात तो म्हणाला **"फक्त जर माझं हे मोठ्ठं डोकं आत शिरलं तर किती चांगलं होईल"** असे म्हणतो तोच त्याचे डोके आत शिरून किंचितही त्रास न होता त्या फटीतून बाहेर आले देखील! जोड्यांचाच प्रताप होता हा. पण प्रश्न उरला शरीर बाहेर निघण्याचा!

"बापरे! भारीच लठ्ठ आहे मी! मला वाटलं, डोक्याचीच केवळ अडचण पडेल! पण हे भलतंच! मला बाहेरच निघता येत नाही! धड एकीकडे, डोकं दुसरीकडे! हे काय?"



त्याने आपले डोके पुन्हा मागे परत ओढण्याचा प्रयत्न केला पण ते मागेही जाईना! त्याला फक्त मान हवी तशी हलवता येई बस! प्रथम तो चिडला, रागावला. मग मात्र तोंडचे पाणी पळाले त्याच्या! त्या जोड्यांनीच तर हे केले होते. स्वयंसेवकाने उलट इच्छा केली असती तर तो सुटला असता पण हे कळलेच नाही झाला.

तो खूप धडपडला. तो मागे डोके ओढी, पुढे काढी, पण जमेचना काही! बापरे! तिथून हलताच येईना त्याला! पाऊस कोसळतच होता आणि रस्त्यावर चिटपाखरूही नव्हते. हॉस्पिटलच्या घंटेपर्यंत त्याचा हातही पोहोचेना! त्याची खात्री झाली की सकाळपर्यंत त्याला तसेच राहावे लागणार–डोके कुंपणाच्या बाहेर नि धड आंत!

कोणीतरी मग सकाळी एखाद्या लोहाराला बोलावून एखादी कांब कापून, त्याचे डोके सोडविणार आणि सगळ्याला अर्थातच वेळ लागणार. तोपर्यंत समोरची शाळकरी मुले टाळ्यापिटीत ज्या उड्या मारणार म्हणता! याहूनही वाईट म्हणजे समोरल्या खलाशांच्या घरांच्या आळीत प्रत्येक जण जागा होईल! आणि या स्थितीत त्यांनी त्याला पाहिले तर दुर्योच व्हायची! त्याच्या मनात पटकन् आले, "लाजेने नि दुःखाने सारे रक्त माझ्या डोक्यात एकवटेल नि मग मला शुद्धच राहाणार नाही....वेडच लागेल

**—नक्कीच...अरे अरे ! यापेक्षा आता यातून मोकळा झालो असतो तर ?—साऱ्या यातना थांबल्या असत्या...''**

हे वाक्य त्याने या आधी म्हणायला हवे होते. मोकळा होण्याची इच्छा करताच त्याचे डोके कांबींतून सटकन मागे सटकले! तो पिसाटासारखा धांवतच आपल्या खोलीत घुसला—जोड्यांनी निर्मिलेल्या आपत्तीने भेदरूनच गेला होता विचारा.

परंतु एवढ्यावरच संपले नव्हते त्याचे संकट. ती रात्र गेली. दुसरा दिवसही गेला. त्या जोड्याचा शोध करीत कोणी आले नाही. त्या रात्री कॅनिकेन रस्त्यावरच्या नाट्यगृहात एक छान कार्यक्रम होता. चिक्कार गर्दी झाली होती. आदल्या दिवशीचा गोंधळ साफ विसरून तो स्वयंसेवक, रस्त्यावर चिखल असल्यामुळे, पुन्हा तेच जोडे घालून, त्या गर्दीत रेटारेटी करीत पुढे घुसताना दिसत होता !

त्या कार्यक्रमात 'माझ्या आजीचा चश्मा' ही हॅन्स ख्रिश्चन अँडरसन या कवीची कविता कोणीतरी वाचणार होते. या चष्म्याची गंमत अशी दाखवली होती की जो कोणी तो घाली त्याला साऱ्या माणसांची अंतःकरणे एकेका कार्डासारखी दिसत नि त्यात त्या माणसांचे भविष्यही त्या चष्म्यांतून वाचता येई !

"नामी कल्पना आहे ही" ते ऐकून स्वयंसेवकाचे विचार कल्पनांत भरकटू लागले. "या चष्म्याने त्यांच्या नशिबात काय आहे ते तर कळेलच **पण त्यांचे अंतःकरण नि विचारही आधीच, स्वच्छपणे वाचताही येतील मला.** किंवा आता या रांगेतल्या स्त्रिया घ्या. यासर्वांची हृदये मांडलेली जणू गमतीदार दुकानेच बनतील या रांगेची. या दुकानांवरून माझी नजर कशी भरभर फिरेल मग! हो ते पहा! त्या स्त्रीच्या अंतःकरणात बायकांच्या टोप्या विकणारा दिसतोय नि या अलिकडचीचे हृदय पारच रिकामे! हा दुकानदार तर सारखा या या म्हणतो आहे मला. **शिरू का साऱ्या दुकानांत ? सारीच हृदये दिसतील मला''**

झाले ! जोड्यांना नवीन इच्छेची सूचना मिळाली. तो स्वयंसेवक अत्यंत सूक्ष्मरूप बनला. पहिल्या रांगेपासून सर्वांची अंतःकरणे पाहू लागला तो. पहिलेच एका स्त्रीचे होते. त्यांत शारिरीक वेड्यावाकड्या अवयवांवर उपचार करणारी एक संस्था होती. संस्थेत वेड्यावाकड्या अवयवांचे ठसे तयार करण्यात येत असत. दुसऱ्या एका स्त्रीच्या हृदयात एक भव्य गंभीर प्रार्थनामंदिर होते. एक कबूतर—निरागसतेचे प्रतीकच जणू—त्याच्या शिखरांभोवती फिरत होते. पुढल्या हृदयात एका पोटमाळ्यात राहाणारी एक आजारी आई दाखवली होती. प्रसन्न सूर्यप्रकाश येत होता तिच्या अरुंद खोलीत आणि छपरावरच्या लाकडी खोक्यात रुजलेले गुलाब डोलत होते. दोन सुंदर पक्षी जुन्या रम्य आठवणी गोवलेली मधुर गीते गात होते आणि ही आजारी आई प्रेमभराने आपल्या मुलीसाठी देवाला आशिर्वाद मागत होती.

बिचारा तो स्वयंसेवक सरतेशेवटच्या रांगेतील माणसांच्या हृदयातून निघताना तर


भलताच भांबावून गेला होता. सर्वांची विक्षिप्त हृदये नि त्यांचे वेडेवाकडे भरकटणारे विचार यांचा त्याला मेळच लागेना. त्याचे डोके ताळ्यावरच येईना !

"देवा, देवा ! मला वेडबीड तर लागणार नाही? असं काय होतंय? भलतंच उकडतंय इथं नि माझं सारं रक्त डोक्यात जातंय." त्याला आदल्या रात्रीचा सारा प्रकार आठवला. त्याचे डोके हॉस्पिटलच्या लोखंडी कांबींच्या फटीत कसे अडकले होते ते आठवले त्याला चटकन. "डोके दबल्यामुळेच आज मला असे भरकटल्यासारखे होत असावे. वेळीच काहीतरी इलाज केला पाहिजे. गरम गरम वाफेचा शेक तरी घेतला पाहिजे मला. **आताच मिळाला असता तर ?**—"त्याला वाटले.

....आणि ताबडतोब तो एका न्हाणीघरात दाखल झाला. त्याचे कपडे, लाकडी जोडे वगैरे सर्व तसेच होते अंगावर ! वाफ वितळून गरम गरम पाण्याचे थेंब छतातून त्याच्या तोंडावर नि डोक्यावर टपाटप गळत होते.

"ओऽ बापरेऽऽ भाजलोऽ" तो ओरडला नि दरवाज्याकडे धावला. नाट्यगृहाच्या दरवाजावरला माणूसही त्याला त्या अवतारात पाहून आश्चर्याने एकदम ओरडला, पण त्या स्वयंसेवकाला प्रसंगावधानही तितकेच होते. तो चटकन म्हणाला, "छेहो ! एकाशी अशा अवतारात बाहेर येण्याची पैज मारली होती मी"—

घरी पोचताच वेडाचा झटका येऊ नये म्हणून पहिल्या प्रथम आपल्या मानेवर राईचं पोल्टिस बांधून जोडे काढून बिछान्यात शिरला तो. दुसऱ्या दिवशी सकाळी बिचाऱ्याची पाठ कमालीची ठणकत होती. जादूच्या जोड्यांनी दिलेले बक्षीस होते ते !



*आश्चर्य ४ थे*

## कारकुनाचे झालेले रूपांतर

तो गस्तवाला पहारेकरी तुम्ही अजून खात्रीने विसरला नसाल. त्याला त्या जोड्यांची आठवण होताच त्याने ते हॉस्पिटलमधून परत आणले. परंतु रस्त्यावरच्या त्या सैन्याधिकाऱ्याने किंवा इतर

कोणीही त्यावर मालकी न सांगितल्याने पाहारेकऱ्याने ते पोलिसखात्याच्या स्वाधीन केले.

"हे तर हुबेहूब माझ्याच लाकडी जोड्यासारखे आहेत!—"कागदपत्रांच्या नकला काढणारा एक पोलिस कारकून आपल्या जोड्याशेजारी ते ठेवीत म्हणाला. "एखाद्या चांभाराला देखील या दोन्ही जोड्यांतला फरक दाखविता यायचा नाही! पैजेवर सांगतो." 'अहो कारकून' म्हणत त्याच वेळी काही कागद घेऊन एक माणूस आत आला. त्याच्याशी बोलण्यासाठी कारकून मागे वळला. त्याचे काम संपल्यावर पुढे वळताच त्या कारकुनाने त्या जोड्यांकडे सहज पुन्हा पाहिले. उजवीकडचा जोड त्याचा कि डावीकडचा त्याचा हे, त्याला ओळखताच येईना! 'ते ओले आहेत ते माझे जोडे असावेत--' त्याला वाटले.

अगदी अशुभ वाटणे होते ते. कारण ते नेमके जादूचे जोडे होते. त्याने ते जोडे घातले. काही कागद आपल्या खिशात घातले आणि काही मूळ प्रती घरी नकला करण्यासाठी आपल्या काखेत मारून तो निघाला.

ती रविवारची सकाळ होती. हवा भारी आल्हादकारक होती. कारकुनाला वाटले– "फ्रेडरिक बर्गपर्यंत जरा फेरफटका करून आलो तर किती छान वाटेल." तो फिरायला बाहेर पडला.

तो काही वेळ इतका तडक चालला होता की जोड्याना आपल्या जादूची चुणूक दाखवायला अवसरच सांपडला नाही.

पुढे एका चौकात त्याला एक ओळखीचा माणूस भेटला. तो एक तरुण नवीनपैकी



कवी होता. उन्हाळ्याच्या सहलीसाठी दुसरेच दिवशी परगावी जाणार असल्याबद्दल त्या कारकुनाला सांगत होता तो.

"काय परत सहलीला? खरंच! वाटेल तिथे भटकायला जाता यायला तू सदा मोकळा असावास हे नशीब खरं तुझं. आमच्यासारख्या साध्यासुध्या माणसांच्या नशीबाची दोरी इतकी कुठून बळकट असायला!" कारकून म्हणाला.

"वा! ही नोकरीची दोरी तुझ्या अन्नरूपी कल्पवृक्षाला कशी गच्च बांधली आहे की! उद्या पोट कसं भरेल याचा विचारच करावा लागत नाही तुला. शिवाय म्हातारपणी तुमचं निवृत्तीवेतन आपोआप पायाशी चालून येतं ते निराळंच!—"

दोघांनीही स्वतःचंच म्हणणं बरोबर अशा आशयाने माना हलविल्या; आणि आपापल्या

वाटेने निघाले. कारकून पुढे जात म्हणाला, "हे कवी म्हणजे मजेदार प्राणी! **ते काय म्हणत असतात ते समजून घ्यायला किंवा स्वतःच कवी व्हायला खात्रीनं किती आवडेल मला.** खरोखरीच वसंतऋतूंतला किती रम्य दिवस आहे आज. अगदी लेखकाला आवडेल असा. हवा किती आल्हादकारक नि आकाशांतले ढग किती सुंदर! पानांफुलांतून किती मधुर सुगंध दरवळतोय सगळीकडे! या वेळी मला जसं भासतंय तसं वर्षानुवर्षांत कधीच भासलं नव्हतं...."

या शेवटच्या वाक्याने तुमची खात्री पटेल की तो कारकून कवी व्हायची इच्छा करताच खरोखरीच लेखक बनला होता नि हे बडबडत होता.

"हा मधुर सुगंध! माझ्या मॅगडलीन मावशीच्या घरच्या व्हायलेट फुलांची आठवण येते मला. हो. तेव्हा एक लहानसा मुलगा होतो मी. माझी छानदार म्हातारी मावशी! किती दिवसांनी आठवण आली आज! पलीकडेच राहायची ती. हिवाळा कितीहि कडक असला तरी काही हिरव्या फांद्या ती मुद्दाम पाण्यात उभ्या ठेवी. व्हायलेट किती गोड उमलत तेव्हा! हो आणि गरम केलेलं एका पेन्सचं नाणं मी हिमाच्छादित तावदानांवर मुद्दाम ठेवी कधी कधी. तिथलं हिम वितळून एक पारदर्शक वर्तुळ निर्माण होई. मग त्यातून बाहेरचा देखावा किती रम्य दिसे!

एक मोठा थोरला पाण्याचा पाट होता समोर. पाणी गोठल्यामुळे त्यावरची जहाजं स्तब्ध उभी असत नुस्ती. एकही खलाशी नसे जहाजांवर. त्यावर बसणारा, एखादा, काव काव करून कर्कश ओरडणारा कावळा म्हणजेच




जणु सर्व खलाशांचं पथक. आणि मग वसंत-ऋतूतल्या वाऱ्याच्या तजेलदार झुळुका वाहू लागताच जणू सर्व वस्तू नव्यान जिवंत होत. हंसत, खेळत, गाणी म्हणत, बर्फ फोडलं जाई आणि जहाजे साफसूफ करून खलशांची पथकं पुन्हा परदेशाच्या सफरीना निघत.

मी मात्र एकटाच मागं राही. जणूं राह्यलंच पाहिजे होतं माझ्या आफिसात मला. आणि तेही इतराना त्यांचे प्रवासपरवाने द्यायला!— ज्यामुळे ते परदेशी प्रवास करू शकतील. हे म्हणे माझं नशीब! अरेरे!" तो कारकून उसासा टाकीत मनाशीच म्हणाला.

परंतु लगेच तो पुन्हा म्हणाला,

"पण मी गेलो परदेशी तर कोण नको म्हणणार? या दृष्टीनं मी विचार तरी कधी केला होता आजपर्यंत? आजची हवाच इतकी तजेलदार आहे की या दृष्टीनं प्रथमच विचार करू लागलोय."

इतक्यात काही पावलावर उभ्या असलेल्या एका मुलाने आपल्या हातातली काटकी एका डबक्यात फेकली. त्यासरशी वरच्या आच्छादणाऱ्या झाडांच्या फांद्यावर त्याचे पाणी उडले.



काही झाडांवर आनंदाने किलबिल करीत असलेल्या पक्ष्यांकडे पाहून तो म्हणाला, "खरंच माझ्याहून किती सुखी ही पाखरं! ती उडूं शकतात! किती कलात्मक! ज्याला उंच भराऱ्या मारता येतात तो खरंच भाग्यवान! मला तर कोणी अदलाबदली करायला सांगितली तर **मला तसला छोटासा पक्षीच व्हावंसं वाटेल.**"

झाले! त्या कारकुनाच्या कोटाची पुढची पुडे नि बाह्या मिळून लगेच पंख बनले! त्याच्या इतर कपड्यांचे पिसात रूपांतर झाले आणि त्याच्या जादूच्या जोड्यांचे पंजे बनले! हसत हसत तो म्हणाला,

"वा, पक्षी बनलो मी लगेच! मला ठाऊक आहे की हा गमतीदार बदल स्वप्नातच सारा. पण मी इच्छा केल्याबरोबर पक्षी होईनच असं मला वाटलं नव्हतं मात्र—"

हिरव्या हिरव्या फांद्यात तो पक्षी उंच उडाला आणि गाऊ लागला. पण त्याच्या गाण्यात काव्य नव्हते. जोडे एका वेळी एकच गोष्ट करीत. त्याला कवी-लेखक व्हावेसे वाटले तो कवी झाला. त्याला पक्षी व्हावेसे वाटले तो पक्षी झाला. त्याच्यातले कवीपण नाहीसे झाले.


कारकून म्हणाला, "हेही काही वाईट नाही. सारा दिवस मी ऑफिसात कागदपत्रांचे काम करीन आणि रात्री फ्रेडरिकबर्गच्या बागेत सुंदर गाणी गाईन! किती झकास गंमत होईल मग!"




तो त्या फांदीवरून उडाला. खाली गवताच्या कोवळ्या अंकुरांवर त्याने टोचे मारले. ते छोटे अंकुर आता त्याला उत्तर आफ्रिकेतल्या खजूरवृक्षांच्या मोठमोठ्या फांद्यांच्या पात्याएवढाले वाटले असतील.

एका क्षणानंतरच काळे काळे जड नि राक्षसी वेष्टन त्याच्यावर फेकले गेले. एका शाळकरी मुलाची मोठी थोरली टोपी होती ती. तिच्याखाली हलकेच त्याने आपला हात घातला आणि त्या कारकुनाची पाठ आणि पंख धरले. पहिल्या झटक्याला तो कारकून ओरडला, "बदमाश कुठला! मी पोलिस ऑफिसातला कारकून आहे म्हटलं. तू काय समजलास?"

पण त्या मुलाला त्याचा पिप्पीऽऽ असाच फक्त आवाज ऐकू आला! त्या मुलाने त्याच्या इवल्या चोचीवर टिचकी मारली आणि त्याला घेऊन तो चालू लागला!



त्याला पुढे इतर दोन शाळकरी मुले भेटली त्यांच्याजवळ पैसे होते. त्यांनी तो पक्षी चा पेन्सला विकत घेतला आणि परत त्य कारकुनाला अशा रीतीने फ्रेडरिकबर्गहून कोपनहेगनला आणण्यात आले.

"केवळ स्वप्नच आहे हे म्हणून ठीक-नाहीतर कसला गहजबच म्हणायचा हा-आधी मी कवी बनलो काय, मग पक्षी बनलो काय! बाकी या मुलांच्या हातात माझे हालच! काय पुढे होणार देव जाणे!"

त्या मुलांनी त्याला एका सुरेख सुशोभित दिवाणखान्यात आणले. तिथे एक लठ्ठशी नि आनंदी दिसणारी बाई सामोरी आली. एक 'नेहमीच मैदानात सांपडणारा पक्षी' त्यांनी बरोबर आणलेला पक्षी पाहून तिच्या मनात आले "खिडकीपाशी असणाऱ्या एका रिकाम्या पिंजऱ्यात त्याला ठेवलं पाहिजे" ती म्हणाली. एका मोठ्या छानदार पिंजऱ्यात ऐटीत झोके खात असलेल्या एका मोठ्या हिरव्या पोपटाकडे पाहून ती म्हणाली, "या आमच्या प्रटी पॉलीला आवडेल हा सोबती. आज पॉलीचा वाढदिवस आहे. तेव्हा या मैदानातल्या पक्ष्यानं त्याचं अभिनंदन करायला हवं नाही का" पॉली उत्तरादाखल एक अक्षरही बोलला नाही.

तो आपल्याच ऐटीत जोरजोराने झोके घेऊ लागला. मात्र आधल्याच उन्हाळ्यात आणलेल्या एका छोट्या, छानदार कॅनरी पक्ष्याने मोठ्याने गाऊन या नव्या पक्ष्याचे स्वागत केले.


आपला रुमाल पिंजऱ्यावर भिरकावीत ती बाई त्या कॅनरीला म्हणाली, "गप बसतोस की नाहीरे बडबड्या."

पोपटाच्या आसपास, कॅनरीच्या जवळच, कारकुनाला—त्या मैदानातल्या पक्ष्याला—एका छोट्या पिंजऱ्यात ठेवले गेले! कारकून आता स्वतः पक्षी बनल्याने त्याला त्या दुसऱ्या दोघा पक्ष्यांचे बोलणे सहज समजू शके.

कॅनरी पक्षी एकदा आपल्या गाण्यात म्हणाला,

"एकदा मी स्वतंत्र, मुक्त पक्षी होतो. हिरव्या खजूरीच्या झाडात नि फुलांनी डंवरलेल्या बदामांच्या झाडांत स्वच्छंद उडायचा मी. माझ्या भावंडांसहित सुगंधी फुलांच्या झुडपांनी घेरलेल्या, आरशासारख्या नितळ पाण्याच्या सरोवराभोवती नि मोहक फुलांवरून कितीदा उडायचा मी. रंगदार नि ऐटदार शेपट्यांचे





अनेक पोपट होते तिथेही. इतक्या इतक्या, नि इतक्या मोठमोठाल्या गोष्टी सांगायचे ते मला "....

पोपट म्हणाला, "अशिक्षित नि रानटी पोपट होते ते, ठाऊक तरी आहे? चल आपण माणसासारखे होऊं या. हास बघूं जरा. जर आपली मालकीण बाई नि इथं सगळे जाणारे येणारे हंसू शकतात तर तुला का हसता येऊं नये? थट्टाविनोद करून हंसता आलं नाही तर बावळट म्हणतात म्हणे. चल माणसासारखं होऊया आपण "....

"पण तुला त्या आपल्या देशात मोठाल्या तबूत राहाणाऱ्या आणि उंच उंच नि फुलांनी बहरलेल्या झाडांखाली सुंदर नृत्य करणाऱ्या त्या मुली आठवतात का? त्यांच्या हातातल्या तबकात किती मधुर फळं असायची! आणि पावलोपावली आठळणाऱ्या वनस्पतीपासून तयार केलेली त्यांच्याजवळची ताजी नि थंडगार सरबते आठवतात?—"

पोपट म्हणाला, "आठवतात तर! पण मला इथं काहीही कष्ट न करता भरपूर खायला मिळतं. आरामात आहे मी...."

कॅनरीला आपल्या मायभूमीची खूप आठवण आली. तो गाऊं लागला....

*"सुंदर माझी मातृभूमि ती !"....*
*—तुझीच गीते गात दिगंती.*
*हरित वृक्ष अन् प्रसन्न वारे,*
*प्रशान्त तव गड जलधिकिनारे,*
*नाजुक लाटा 'छुमुक' नाचती,*
*वाकुन शाखा त्यांस चुंबिती.*
*निवडुंगांच्या रम्य ततीतुनी*
*बागडलो अम्हि भाऊबहिणी.*
*रंग मनोहर, मञ्जुळ स्वर हा—*
*अम्हा पाखरा तुझाच वर हा !*
*बाळ तुझा मी. गात दिगंती,*
*"सुंदर माझी मातृभूमि ती !"*

"ए ऽ ! हात जोडतो तुला. पुरे कर तुझं ते रडगाणं. काही तरी हंसू येण्यासारखं म्हण" पोपट म्हणाला.

तो कॅनरी पटकन कारकुनाला म्हणाला, "चिमण्या डेनिश पक्ष्या ! तू देखील माझ्यासारखा बंदिवान आहेस रे ! तुझ्या देशाच्या जंगलात भारी थंडी असेल आता, पण तिथं स्वातंत्र्य नक्कीच आहे....अरेच्या पण ? अरे, पळ, पळ ! पळ भर्कन ! तुझ्या पिंजऱ्याचा दरवाजा बंद करायला विसरले ते....खिडकी उघडी आहे. पळ—उडून जा बाहेर—जा बाहेर—"

कारकून चटकन उडी मारून पिंजऱ्याबाहेर आला. खोलीचे दारही अर्धवट उघडेच होते. आणि—हळूच—अगदी हळूच—चोरपावलांनी गुपचूप दोन चमकदार हिरवेगार डोळे–बापरे ! त्या खोलीत एक मांजर....आत शिरले ! गुपचूप !—

कॅनरी आपल्या पिंजऱ्यात फडफडला.

पोपट जोरात आपले पंख आपटीत ओरडला.,
"चला माणसासारखे होऊ या आपण"

बिचारा कारकून समोर दिसणाऱ्या अक्राळविक्राळ मृत्यूच्या भयाने भेदरून जो उडाला तो थेट खिडकीच्या बाहेर ! पार बाहेर !.... घरांवरून, रस्त्यांवरून खूप खूप वेळ उडत राहिला तो. अखेर इतका कमालीचा थकला तो की कुठेतरी थांबावसं वाटलं त्याला. तोच समोरच्या घराकडे पाहिले तो काय ! समोरचे घर ओळखीचे वाटले त्याला एकदम ! एक खिडकी उघडी होती घराची. भुरकन आंत शिरला तो–त्याच्याच खोलीत नेमका ! त्याने टेबलावरच थेट उडी मारली !

अर्धवट बेशुद्धीत तो पोपटाच्याच तोंडचे वाक्य बरळला. "**चला माणसासारखे होऊं या आपण...**" आणि दुसऱ्याच क्षणी तो पुन्हा नेहमीसारखा नकला काढणारा कारकून बनला ! स्वतःच्याच टेबलावर अगदी आरामशीरपणे काम करीत बसला होता तो !

### *आश्चर्य ५ वे*

## सरतेशेवटची व उत्तमातली उत्तम देणगी

दुसरे दिवशी, सकाळीच, तो कारकून झोपलेलाच असताना कोणीतरी दार ठोठावले. तो त्याचा शेजारी होता. एक धर्माभ्यास करणारा विद्यार्थी होता तो आणि त्याच मजल्यावर कारकुनाच्या खोल्याशेजारच्या खोल्यात राहात होता. तो घरात आला.

"मला तुमचे जरा जोडे द्या बघू थोडा वेळ ऊन पडलं असलं तरी सर्दी आहे हवेत आणि बागेतली जमीन अजून ओलीच आहे. बागेत फिरून येतो जरा नि विडीचा झुरकाही घेत येईल मग ऊब आणायला."

त्याने जोडे चढवले नि बागेत गेला तो. सकाळचे सहा वाजले होते. रस्त्यावरून नुकताच सकाळचा भोंगा ऐकू आला होता.

"खरंच! प्रवासाला जाणं! प्रवासाला जाणं! याच्याइतकं आनंददायक या जगात काहीच नसेल. माझी मोठ्यात मोठी इच्छा जर काही असेल तर हीच. माझ्या मनाची तळमळ मगच शांत होईल. **त्या नयनरम्य स्वित्सरलंडला जावंसं वाटतंय...इटली पाहावीशी वाटतेय......"**

क्षणाचाही विलंब न लागता त्या जोड्यांनी त्याची इच्छा पूर्ण करायला सुरवात केली. स्वित्सर्लंडमध्ये इतर आठ धर्माभ्यासू प्रवाश्यां-बरोबर तोही फिरत होता!

त्याचे डोके अतिशय दुखत होते, पाठ तर फारच दुखत होती आणि घट्ट जोड्यांत सतत अडकून पडल्याने पायही कमालीचे सुजले होते! अर्धवट झोपेतच होता तो नि अर्धा जागा! त्याच्या एका खिशात काही कामाचे कागद होते तर दुसऱ्यात प्रवास परवाना! आणि पैशाच्या छोट्या चामडी पाकिटात काही नाणी होती.

हिम पडू लागले. गारगार वारे सुटले. "अरेरे" तो हळहळत म्हणाला, "—जर का या आल्प्स पर्वताच्या पलीकडच्या बाजूला मी गेलो तर?....उन्हाळा असेल तिथं आणि बाहेर हिंडून माझे चेक मला वटवता येतील. कारण पैसे नसल्यामुळे स्वित्सर्लंडला जाता येत नाही मला आता. **खरंच पलीकडे जावंसं वाटतंय. जर गेलो तर..."**

आणि ताबडतोब तो आल्प्सच्या पलीकडे इटलीत—फ्लॉरेन्स व रोम शहरांच्या मधल्या प्रदेशात फिरू लागला. त्याच्या पुढ्यात निळसर जांभळट पर्वतांच्यामधे थ्रेसीमेन सरोवर पसरले होते. आकाशातल्या चकचकीत संध्या-रंगांनी ते पाणी तांबूस सोनेरी दिसत होते. मनोहर द्राक्षवेली मोठ्या प्रेमाने आपले चमक-दार नि डौलदार तणावे कुरवाळीत होत्या. अर्धवट कपडे घातलेली मुले सडकेच्या दुतर्फा दाटीवाटीने घरी चाललेल्या गुटगुटीत डुकरांना हाकारत होती. आपण जर हे चित्र कागदावर रंगवले असते तर कोणीही उद्गारले असते, "किती सुंदर इटली!" पण आपला धर्माभ्यासू प्रवासी नि त्याचे साथी काहीच बोलले नाहीत. इतक्यात एक प्रकारच्या विषारी माश्या नि डास त्यांच्याभोवती हजारानी घोंघावू लागले. फुकटच बिचाऱ्या त्या प्रवाश्यानी त्यांच्या प्रतिकाराचा प्रयत्न केला. त्यामुळे ते अधिकच चावू लागले. त्या चावण्याने गांधी आल्या नाहीत किंवा चेहरा सुजून विद्रूप झाला नाही असे कोणीच राहिले नाही. बिचाऱ्या घोड्यां-नाही माश्यांच्या झुंडीच्या झुंडी चावू लागल्या. गाडीवान जरा त्यांना हाकलायला खाली उतरला की लगेच त्या पुन्हा तिथे येत.

सूर्यास्त झाला. सबंध भूप्रदेशावर एकदम गारठा पसरला. साऱ्या दिवसाच्या उबेनंतर

रात्रीचा झोंबरा गारठा म्हणजे त्रासदायकच !

भोवतालच्या पर्वतशिखरांना आच्छाद-णाऱ्या ढगांनी विरक्षित हिरवा रंग धारण केला होता. जुन्या काही रंगीत चित्रात आढळतो तसा, अनोळखी डोळ्यांना कृत्रिम वाटावा असा—खरेच—अत्यंत मनोवेधक देखावा होता तो !

परंतु या सर्व प्रवाश्यांचे पोट भुकेने वखवखले होते, नि शरीर थकून गेले होते. रात्री कुठेतरी निवारा मिळावा एवढी एकच आढ होती सर्वांना.

त्यांचा रस्ता ऑलिव्हच्या रानातून जात होता. डेनमार्कमधे वाळुंजीच्या गुंतलेल्या दाट झाडाझाडातून गेलेला एखादा रस्ता जसा आढळला असता तसाच होता तो. आणि तिथे एकच एक विश्रांतिगृह पाहिले त्यानी. त्याच्या-समोर जवळ जवळ दहाबारा लुलेपांगळे भिकारी लोळत पडले होते. काही आंधळे होते, काही महारोगीही. मूर्तिमंत दुर्दशा होती तिथे. घाणेरडे कपडे घातलेली, केस पिंजारलेली नि अनवाणी पायाची विश्रांतिगृहाची ओंगळ मालकीण पुढे आली. तिने या नव्या पाहुण्यांचे स्वगत केले !




त्या इमारतीची दारे दोऱ्यांनी बांधून सारखी ठेवली होती. जमीन मोडक्यातोडक्या विटांची बनवली होती. ठेंगण्याशा छतात वटवाघळे इकडून तिकडे मागेपुढे घिरट्या घालीत होती. आणि घाणेरडा वास ! तो तर असह्यच !

थोडी हवा आत येण्यासाठी खिडक्या उघडल्या गेल्या. तोच महारोग्यांनी आपले गलित हात वर केले. "अरेरे काय दुर्दशा!" प्रवासी ओरडले.

रात्रीचे जेवण आले. प्रथम सार आले. त्यात पाणी, मिरे नि खवट तेल होते. कोशिंबिरीतही तेच होते. शिळी अंडी, आणि कोंबडीचे भाजलेले तुरे हे खास पदार्थ. मद्याला सुद्धा कशीशीच चव होती—कसले तरी विचित्र मिश्रण होते ते !

दारापुढेच प्रवाशांच्या पेट्यांचा ढिगारा रचण्यात आला. इतर झोपले असता कोणातरी एकाने पाहारा करायचा होता पेट्यांवर.



आपल्या धर्मशास्त्राच्या विद्यार्थ्यांवरच पाळी आली प्रथम. किती कुंद खोली होती त्यांची. कमालीचे उकडत होते. डास घोंघावत नि कडकडून चावत. बाहेरील दुर्दैवी लोक सतत विव्हळायचे, मोठमोठ्याने ओरडायचे!

"खरंच, प्रवास ही फारच सुखदायक बाब झाली असती—फक्त जर हे शरीर नसतं तर! किंवा आत्मा साऱ्या दूर, स्वैर फिरून येईतो शरीराने एकाच जागी स्थिर राहायला हवं होतं. जिथं मी जातो तिथं मला कसली तरी असामान्य ओढ लागते—माझा जीवच खाते ती जसा! काहीतरी हवंय मला. हो काहीतरी–पूर्णत्वाला पोहोचलेलं–परब्रह्म–काय असेल ते?—मला कळत नाही मला काय हवंय ते—**हो, मला हवंय... चिर-काल-सुख, परमानंद, अनंत आनंद!**"

असं म्हणताच तो आत्म्याच्या रूपाने पुन्हा एकदा आपल्या घरी येऊन दाखल झाला. खिडक्याना लांब, शुभ्र पडदे होते. खोलीच्या मध्यभागी एक काळीभोर शवपेटिका ठेवलेली होती. मृत्यूनंतरची चिरनिद्रा घेत त्याचे शरीर त्यात झोपले होते! त्याची इच्छा पूर्ण झाली होती. त्याचे शरीर विश्रांति घेत होते आणि त्याचा आत्मा या जगाच्या पाशातून मुक्त असा स्वैर फिरत होता. खोलीत दोन व्यक्ती हालचाल करताना आढळत होत्या. एक नियतीची प्रतिनिधी परी होती नि दुसरी परी होती **चिंता**. त्या मृत देहावर वाकून त्या काही पाहात होत्या. **चिंता** म्हणाली, "पाहिलस. तुझ्या जोड्यांनी माणसाना काय काय सुख नि सद्भाग्य दिलं ते!"

नियतीची प्रतिनिधी म्हणाली, "खात्रीनं पाहिलं. या झोपलेल्या माणसाला त्यांनी खरा नि अत्यंत आनंद दिलाय. इतरांना नसेल कदाचित"

**चिंता** म्हणाली, "छे! त्याचा मृत्यू जोड्यानीच इच्छिला मुळी. त्याच्या आत्म्याच्या डोळ्यांना या जगात सर्वत्र भरलेल्या खऱ्या सुखराशी दिसल्या नाहीत. त्याच्यासाठी नेमलेलं कार्यही केलेलं नाही त्यानं. मी खरोखरीच त्याचं खरंखुरं कल्याण त्याच्या स्वाधीन करते बघ" असे म्हणून तिने त्या मृतदेहाच्या पायातले जोडे काढून स्वतःच्या ताब्यात घेतले.

तत्क्षणीच मृत्यूची चिरनिद्रा भंग पावली. तो मेलेला माणूस पुन्हा जिवंत झाला–तितकाच उत्साही राहिला होता तो. ते जोडे घेऊन दुसरी परी व **चिंता** नाहीशा झाल्या तिथून.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
क्रमांक ५६५९३ दि ...बा.वा...
क्रमांक ३६५० नोंद दि ...३०।३।७१




# उडती पेटी

एकदा एक व्यापारी होता. तो इतका श्रीमंत होता की तो आपल्या घरापुढून जाणारा सगळा रस्ता नि आजूबाजूच्या सगळ्या गल्ल्या चांदीच्या पत्र्याच्या तुकड्यांनी मढवू शकला असता. त्याने तसे केले मात्र नाही. त्याला आपल्या पैशांचा एखादा निराळ्या तऱ्हेने कसा उपयोग करायचा हे चांगले ठाऊक होते. त्याने रोज एक एक शिलिंग बाजूला शिलकेत टाकला की त्याचा लगेच क्राऊन तयार होई.

तो वारल्यावर त्याची सगळी धनदौलत त्याच्या मुलाला मिळाली. पण मुलाने ऐषाराम नि चैनबाजीला सुरवात केली. दर संध्याकाळी तो नाटकतमाशाना जाई. नोटा चिकटवून त्यांचे पतंग बनवी आणि बागेच्या तळ्यातल्या बदकांना गमतीत खडे मारण्याऐवजी सोन्याच्या मोहरा फेकून मारी?

अशा उधळपट्टीमुळे त्याचे पैसे लवकरच नाहीसे झाले. त्याचे कपड्यांचे कपाट रिकामे होऊन त्यात फक्त घरात घालण्याचा पायघोळ अंगरखा नि जोड्यांचा—चढावांचा एक जोड एवढयाच वस्तू शिल्लक राहिल्या. त्याचे मित्र त्याला मुळीच विचारीनात, कारण आता त्याच्याभोवती फिरण्याचे त्यांना कारणच नव्हते.

एकजण त्याच्या इतर मित्रांपेक्षा जरा भला होता. त्याने त्याला एक जुनी पेटी—'यात तुझं सामान भर नि चालता हो,' अशा सल्ल्यासहित भेट पाठवली. ही कल्पना चांगली होती पण त्या पेटीत भरायला त्याच्याजवळ





होतेच काय? म्हणून तो स्वतःच त्या पेटीत बसला!

मोठी आश्चर्यकारक पेटी निघाली ती! तिचे पोट कुलूप घट्ट दाबून धरले की ती उडू लागे! त्या व्यापाऱ्याच्या मुलाने कुलूप सहज दावले. तो काय चमत्कार! त्याच्या घरच्या धुराड्यातून ती पेटी जी उड्डाण करू लागली ती थेट ढगात! नी वर वर, उंच उंच लागली जोरात उडायला!


त्या पेटीचा तळ जरा करकर वाजला. व्यापाऱ्याचा मुलगा एकदम घाबरला. कारण जर त्याचे दोन तुकडे झाले असते तर तो भलत्याच उंचीवरून आदळला असता खाली.

परंतु ती पेटी अगदी सुरक्षितपणे खाली आली आणि त्याला आढळले की तो तुर्कस्तानात येऊन पोहोचला आहे. रानात, पाचोळ्याच्या भल्याथोरल्या ढिगाऱ्याखाली त्याने आपली पेटी लपवून ठेवली आणि तिथून शेजारच्या गावात गेला तो. त्याला आढळले की तिथले सगळे लोक त्याच्या अंगावरल्या पायघोळ अंगरख्यासारख्याच पोशाखात होते. त्याच्या चढावासारखेच त्यांच्या पायातही चढावच होते!

एक छोटेसे मूल हातात घेऊन चाललेली एक दाई भेटली त्याला रस्त्यात. त्या गावालगतच दिसणारा राजवाडा कोणत्या राजाचा त्याची त्याने तिच्यापाशी चौकशी केली.

"राजाची राजकन्या राहाते तिथे." त्या दाईने उत्तर दिले. "असं कोणीतरी भविष्य वर्तवलंय तिच्याबद्दल की, तिचा प्रियकर





तिला अतिशय दुःखी करील. राजा आणि राणी तिथं हजर असल्याशिवाय तिला कोणीही भेटायचं नाही असा हुकूम आहे म्हणून."

"आभारी आहे" तो व्यापाऱ्याचा मुलगा म्हणाला. तो लगेच आपल्या रानात परत गेला. नंतर आपल्या पेटीत बसला तो आणि उडत उडत सरळ त्या राजमहालाच्या गच्चीवर येऊन ठेपला. पेटीतून निघून तो एका खिडकीतून आत शिरला आणि राजकन्येच्या दालनातच येऊन थडकला!

एका पलंगावर राजकन्या शांत झोपली होती. ती इतकी कमालीची देखणी होती की अत्यादराने त्याने तिच्या हाताचे चुंबन घेतले.

स्पर्शाने ती लगेच जागी झाली. हा अनपेक्षित पाहुणा पाहून ती घाबरली. परंतु त्याने सांगितले की तो एक तुर्की लोकांच्या देवाचा दूत होता आणि तिला वरण्याकरिता तिथे थेट आकाशातून अवतरला होता. हे ऐकताच ती खूप खूष झाली. शेजारीशेजारी बसून त्यांनी

चिकार गप्पा मारल्या. त्याने तिच्या डोळ्यांचे वर्णन केले. ते जणू सुंदर काळसर निळे दोन समुद्रच, आणि तिचे विचार नि मनातले भाव जणू मोहक मत्स्यकन्यांप्रमाणेच पोहतात त्यात. तिच्या काळ्याभोर भुवया म्हणजे गोऱ्याकपाळरूपी हिमाने आच्छादलेले दोन डोंगर.... वगैरे वगैरे असे खूप वर्णन केले त्याने तिच्या रूपाचे.

अशा रीतीने गोडगोड बोलून त्याने तिला लग्नाची मागणीही घातली आणि तिने चटकन त्याला होकारही दिला!

"परंतु तू शनिवारी इथं आमच्याकडे आलं पाहिजेस." ती म्हणाली. "राजा आणि राणी त्या दिवशी संध्याकाळी माझ्याबरोबर चहा घेतात या माहालात. एका तुर्की देवदूताशी माझं लग्न ठरलेलं पाहून भारीच आनंद होईल त्यांना आणि भारी अभिमान देखील वाटेल. आणि बरं का. तू त्यांना एक छानपैकी गोष्ट सांगायचीस-कारण त्यांना गोष्टी फार आवडतात. माझ्या आईला चांगले तत्त्व असलेल्या आणि श्रीमंत लोकांच्या गोष्टी आवडतात. आणि माझ्या बाबांना मजेशीर आणि हंसू येईल अशा गोष्टी आवडतात."

"ठीक आहे. नववधूला इतर काही एखादी वस्तू नजर करण्याऐवजी एखादी गोष्टच नजर करीन म्हणजे झालं." तो व्यापाऱ्याचा मुलगा म्हणाला.

त्यांनी मग एकमेकांचा निरोप घेतला. तो जाण्याआधी त्या राजकन्येने सोन्याने मढवलेली एक पल्लेदार तरवार त्याला बक्षीस दिली. या



बक्षिसाचा काय उपयोग करायचा हे त्याला फारच छान समजत होते.

तो आपल्या पेटीतून उडत उडत तिथून निघाला. त्याने एक नवा पायघोळ अंगरखा विकत घेतला. नंतर तो रानात गोष्ट तयार करीत बसला. हो! शनिवारपर्यंत पूर्ण व्हायला हवी होती ती.

सरते शेवटी एकदाची ती गोष्ट तयार झाली. आणि शेवटी एकदाचा तो शनिवारही उजाडला.

राजकन्येच्या महालात, राजा, राणी, दरबारातले सारे सरदार त्याची वाट पहात चहासाठी खोळंबले होते. राजकन्येच्या त्या भावी वराचे मोठ्या थाटात स्वागत करण्यात आले.


राणी म्हणाली, "कां, गोष्ट सांगणार ना आम्हाला. अशी गोष्ट सांगाल एखादी झकासपैकी की बस! अशी झकास अगदी की ज्यात खूप चांगली शिकवणूक असेल नि खूप खोल अर्थ असेल...."

राजा म्हणाला, "परंतु तिनं आम्हाला खूप गंमतही वाटली पाहिजे बरं का...."

"मोठ्या खुशीनं सांगेन अशी गोष्ट" तो व्यापाऱ्याचा मुलगा म्हणाला. आणि मग ही गोष्ट सांगितली त्याने.

—एकदा एका श्रीमंत घरात स्वैपाकाच्या ओट्यावर एक आगकाड्यांचा जुडगा होता. आपल्या उच्च कुळाबद्दल, पूर्वजांबद्दल भारी घमेंड होती त्या आगकाड्यांना. त्यांचे पूर्वज म्हणजे ते उंचच उंच 'फर'चे झाड. त्याच्या चिपातूनच ती प्रत्येक आगकाडी बनवली होती. आता हे झाड अनेक वर्षांपासून लोकांना परिचित होते कारण त्या रानातल्या इतर झाडांपेक्षा ते पुष्कळच उंच होते आणि जुनेही होते.

शेकोटीच्या वरच्या फळीवर आता त्या आगकाड्या पडलेल्या होत्या. त्यांच्या एका बाजूला एक लोखंडी तवा होता. त्या आगकाड्या नेहमी आपल्या लहानपणाच्या गमती याच दोघांना सांगायच्या. त्या एकदा म्हणत होत्या, "हो तर! जेव्हा आम्ही झाडाच्या हिरव्याहिरव्या फांद्यांवर होतो ना....खरोखरीच त्या हिरव्याहिरव्या फांद्यांवर राहात होतो ना तेव्हा किती पण मजा असायची! दर सकाळसंध्याकाळी आम्हाला हिऱ्यांचा चहा मिळे--आहे का ठाऊक? ते हिरे म्हणजे अर्थात दवबिंदू. सारा दिवस आम्हांला लखलखीत सूर्यप्रकाश मिळे आणि जेव्हा सूर्य प्रकाशत असायचा तेव्हा सारा वेळ पाखरं आम्हाला गोष्टी सांगायची. हे सुद्धा अगदी सहज लक्षात येईल कोणाच्या की आम्ही पुष्कळ श्रीमंतही होतो, खूपच श्रीमंत. कारण इतर झाडं फक्त उन्हाळ्यातच हिरव्या पानांनी नटलेली असतात. परंतु आमच्या कुटुंबाजवळ उन्हाळा नि हिवाळा या दोन्ही ऋतूत नटण्याइतकी पाने असायची. परंतु एकदा काही लाकूडतोडे आले. केवढा गोंधळ माजला!— आणि आमच्या कुटुंबाची साफ वाताहत केली त्यांनी. आमचे ते बुंधे आजोबा! ते एका अत्यंत भव्य जहाजाचे मुख्य शीड बनले. झाडाच्या फांद्या अनेक निरनिराळ्या जागी पाठविल्या गेल्या



आणि या नंतर सर्वसामान्य लोकांना बिचाऱ्यांना प्रकाश देणे हेच एक आमचे महान जीवित कार्य बनले. आता कल्पना येईल तुम्हांला की आमच्यासारख्या उच्च कुळात लोळत जन्म घेतलेल्याना असं स्वयंपाकघरात लोळत राहावं लागलं म्हणजे काय वाटत असेल."

इतक्यात आगकाड्यांच्या जवळच पडलेला तवा म्हणाला, "माझा इतिहास फारच निराळा आहे. मी जन्माला आल्या मिनिटापासून घासला जातोय, खरडला जातोय, ताप ताप तापवला जातोय कितीकितीदा पण! मला थोडा कसला विरंगुळा जर मिळत असेल तर तो जेवणानंतर, घासून पुसून लख्ख होऊन इथं या ओट्यावर उभा राहतो तेव्हा. आमच्यांत गावगप्पा गोळा करण्यात पटाईत जर कोणी असेल तर ती म्हणजे अंगणातली कापलेली हिरवळ गोळा करायची टोपली. इतकी सारखी बडबड करत असते ती.

तितक्यात चकमक डबी म्हणाली, "उगाचच काहीतरी बडबड चाललीय सर्वांची तुमची." बोलताना तिच्यातल्या चकमकीतून ठिणग्या उडत होत्या. आपण काहीतरी करमणुकीच्या गोष्टीत घालवूया की ही संध्याकाळ" तिने वाक्य पूर्ण केले.

सुरई म्हणाली, "ऐका. मी सुरवात करते. ....बाल्टिक समुद्राजवळ, डेनमार्कच्या बीच-वृक्षांच्या राईत........"

साऱ्या बशा एकदम ओरडल्या, "छान छान सुरवात आहे ही. एखाद्या कहाणीसारखीच आहे"

"होय तिथंच मी माझ्या तरुणपणीचे दिवस घालवले. एक शांत कुटुंब होतं आमचं. तिथं दर पंधरवड्याला, जागा धुतली जाई, सामानसुमान साफसूफ होई, स्वच्छ धुतलेले पडदे वापरायला काढण्यात येत........"

"किती छान....तुझी किती वर्णन करण्याची हातोटी! खरंच किती आकर्षक!".... फुलझाडणी म्हणाली. "कोणीही म्हणेल की खात्रीनं ही एखादी बाईच गोष्ट सांगतेय.... किती स्वच्छ सारं...." तिने बोलणे पूर्ण केले. सगळ्या बशांनी खडखड आवाज करून प्रशंसा केली, फुलझाडणीने थोडी कोथिंबीर घेऊन त्या सुरईवर ठेवली. जणू मुकूटच घातला तिला तिच्या सन्मानार्थ. तिला मनात वाटत होते, "आज जर मी हिला सन्मानार्थ मुकूट घातला तर उद्या ती मलाही घालेल."

त्यानंतर सांडशी म्हणाली, "मी आता नृत्य करून दाखवते बरं का मंडळी" तिने खरोखरीच नृत्य सुरू केले. किती आश्चर्यकारकपणे ती आपला एक पाय हवेत उडवायची! कोपऱ्यातल्या खुर्चीचा अभ्रा तर त्या आश्चर्याने थक्क होऊन एकदम टरकला. मावेचना त्याच्या पोटात ते आश्चर्य!

यापुढचा कार्यक्रम म्हणून चहादाणीला गाणे म्हणायला सांगितले सर्वांनी. पण सर्दी झाली होती तिला नि गारठलेली होती ती. तिच्यातले पाणी उकळत असतानाच फक्त तिला गाता येई.

खिडकीच्या फळीवर एक पिसाचा टाक पडला होता. घरातली मोलकरीण लिहिण्यासाठी तो वापरी नेहमी. त्याच्याबद्दल विशेष असे काही नव्हते. तो टाक म्हणाला,


"हो, चहादाणीला जर नसेल गाणं म्हणायचं तर जाऊ देत. न म्हणू देत. एवढी तिची मिजास कशाला? खिडकीच्या बाहेरच पिंजऱ्यात हा इथं बुलबुल आहे. खरं म्हणायचं तर इतर कुणासारखं मुद्दाम शिकला नाही तो. पण स्वाभाविकपणेच किती गोड गातो!"

इतक्यात, त्या खोलीचे कोणीतरी दार उघडले. त्या घरातली मोलकरीण होती ती. त्या ओट्यावरील प्रत्येक वस्तू अगदी गप्प झाली एकदम. हालचालही करीना.

त्या मोलकरणीने खसकन आगकाड्या घेतल्या आणि पेटवल्या. किती लख्ख उजेड पडला त्यांचा. पेटताना त्या म्हणाल्या,

"आता सगळ्यांना स्पष्टच दिसेल की आमचा दर्जा किती वरचा आहे ते. किती लखलखतो आम्ही."

....दुसऱ्याच क्षणी त्या जळून खाक झाल्या! त्यांचा प्रकाश कायम नाहीसा झाला आणि त्यांची घमेंड देखील!"




राणी म्हणाली, "झक्कच आहे गोष्ट ही. मला तर अगदी असं वाटलं की मी स्वतःच त्या स्वयंपाकघरात गेले होते. त्या सर्वांची घमेंड उतरलेली पाहायला. सुंदरच गोष्ट! अगदी अवश्य माझी मुलगी मी तुम्हांला देईन."

राजा म्हणाला, "मोठ्या खुशीनं! सोमवारीच आमच्या कन्येशी आपला विवाह होईल."

विवाहदिनाच्या आदल्या संध्याकाळी सर्वत्र शहरभर खूप रोषणाई केली होती. सर्व लोकांना पेढेबर्फी, मिठाई, साखरवलेली फळे सर्रास वाटण्यात येत होती. रस्तोरस्ती सगळी मुले आनंदाच्या भरात ओरडा-ओरड करीत होती. बोटातून शिळा घालीत होती.

व्यापाऱ्याच्या मुलाला वाटले, "माझ्याकडूनही मी आता आनंदोत्सव केला पाहिजे." म्हणून त्याने बाजारातून काही, आकाशबाण, उडत्या चांदण्या, उडती चक्रे, उडत्या मेणबत्त्या, रॉकेट, चिड्या, आणि इतर अनेक प्रकारचे आकाशात उडवण्याचे दारूकाम नि फटाके



खरेदी केले. ते त्याने आपल्या पेटीत भरले आणि तीतून हवेत उडता उडता त्यातले थोडे थोडे दारूकाम नि फटाके तो खाली सोडत गेला.

सगळे तुर्की लोक इतक्या उंच उड्या मारून नि इतक्या घाईघाईने ते पाह्यला बाहेर रस्त्यावर आले की त्यांचे जोडेही सुटून हवेत उंच उडू लागले. असले दारूकाम, असले फटाके !– जणू धूमकेतूंची गर्दीच वाटली त्यांना ! त्यांनी आकाशात पूर्वी कधीच पाहिली नव्हती अशी आतषबाजी ! आता त्यांची खात्री झाली की या लवाजम्यात तो देवदूतच राजकन्येशी लग्न लावायला समारंभाने आकाशातून येत असावा.

तो व्यापाऱ्याचा मुलगा आपल्या पेटीत बसून रानात उतरताच स्वतःला म्हणाला, "मला आता जरा गावात जाऊन आलं पाहिजे. लोक माझ्याबद्दल काय म्हणतात ते समजेल जरा... आकाशात मी तयार केलेला दारूकामाचा देखावा कसा काय वाटला त्यांना तेहि कळेल त्यांच्याकडून."

बापरे, बापरे ! इतकी गमतीदार नि रस-भरित वर्णने मिळाली त्या देखाव्याची म्हणतां ! जो जो त्याला भेटला त्या प्रत्येकाने त्याच्या-पुढे तो आतषबाजीचा लखलखीत देखावा आपापल्यापरीने निरनिराळाच उभा केला आपल्या शब्दात. परंतु सर्वांच्या म्हणण्याचे तात्पर्य हे की तो देखावा कमालीचा आश्चर्य-जनक, पूर्वी कधीही दिसला नव्हता असा नि अगदी डोळे दिपून जातील इतका सुंदर होता !

एकाने तर ठासून सांगितले, "मी त्या देवदूताला प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांनीच पाहिले. झळझळत्या ताऱ्यांसारखे त्याचे डोळे होते. आणि फेसाळलेल्या पाण्याप्रमाणे त्याची दाढी होती !...."

वस्त्रवाच्या आवरणात तो आकाशात इकडून तिकडे फिरत होता. आणि त्याच्या आवरणातून चिमुकली चिमुकली सुरेख सुरेख बाळे मारे डोकावून पाहात होती खाली !"

हे ऐकून तो परत आपल्या रानाकडे निघाला. पुन्हा आपल्या पेटीत शिरून उड्डाण करायचे होते त्याला........

परंतु !....परंतु हाय ! ती पेटी पार जळून गेली होती ! आकाशातले दारू काम चालू असता एक अगदी बारीकशी ठिणगी त्या पेटीच्या आत पडली. तिने हळूहळू पेट घेतला. आग पसरून आतले दारूकामही पेटले. त्या-बरोबर ती सबंध पेटीच पेटली. पेटीची अगदी राख झाली सारी. बिचारा तो व्यापाऱ्याचा मुलगा आता पुन्हा कधीच उड्डाण करू शकणार नव्हता.... पुन्हा परत तो आपल्या नव-वधूला कधीच भेटू शकणार नव्हता....कधीच नव्हता....

दर दिवशी, अगदी प्रत्येक दिवशी ती आपल्या राजवाड्याच्या गच्चीवर बसून त्याची आतुरतेने वाट पाहाते....डोळे किलकिले

...ला शोधते....अगदी ...ला वाटते की निश्चित तो येईल.

तो मात्र वेड्यागत सबंध जगभर हिंडतो आहे–देशोदेशी आपल्या तऱ्हेतऱ्हेच्या नि मन भारून टाकतील अशा गोष्टी सांगतो आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ...९६५९३ वि ...बा. ना.
क्रमांक ...३६५० नोंद दि ...२७।३।८७



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ...९२२८ नों दि ..........
वि. ...बा. ना. ... क्र. ..................

IRBK-0112287

